# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक १३६) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी–०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार, दि.२४ मे २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## ‘मुख्यमंत्री तीर्थदर्शन यात्रे’ला ब्रेक, राज्य सरकारचा निर्णय; २५ मे ची विशेष रेल्वेगाडी रद्द

नागपूर दि.२३ (प्रतिनिधी)– राज्यात विधानपरिषदेची आदर्श आचारसंहिता लागू झाल्यामुळे ज्येष्ठ नागरिकांसाठीची ‘मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना’ सद्यस्थितीत स्थगित करण्यात आली असून, येत्या २५ मे रोजी बिहारसाठी सुटणारी विशेष रेल्वेगाडी रद्द करण्यात आली आहे.

राज्यातील ६० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना देशातील प्रमुख तीर्थक्षेत्रांची मोफत सफर घडवून आणण्यासाठी राज्य शासनाने ‘मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना’ सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत नागपूरहून २५ मे रोजी बिहारमधील महत्त्वाच्या ऐतिहासिक आणि धार्मिक स्थळांसाठी एक विशेष रेल्वेगाडी रवाना होणार होती. मात्र, १८ मे पासून राज्यात विधानपरिषद निवडणुकीची आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. निवडणूक काळात मतदारांवर प्रभाव पाडणाऱ्या सरकारी योजनांवर किंवा नव्या उपक्रमांवर निर्बंध येत असल्याने, प्रशासनाला या यात्रेला तूर्तास ‘ब्रेक’ लावावा लागला आहे. या पहिल्या टप्प्यातील विशेष तीर्थदर्शन यात्रेदरम्यान ज्येष्ठ नागरिकांना बिहार राज्यातील जागतिक वारसा स्थळांची सफर घडवली जाणार होती. यात प्रामुख्याने भगवान गौतम बुद्ध यांची ज्ञानभूमी आणि साधना भूमी असलेले गया येथील ‘महाबोधी मंदिर’, ऐतिहासिक ‘राजगीर’ आणि प्राचीन शिक्षणाचे केंद्र असलेले ‘नालंदा’ या अत्यंत पवित्र आणि प्रेक्षणीय स्थळांचा समावेश होता. या यात्रेसाठी नागपूर व परिसरातील अनेक वृद्ध भाविकांनी मोठ्या उत्साहात नावनोंदणी केली होती. मात्र, ऐन प्रवासाच्या तोंडावर ही स्थगिती आल्याने ज्येष्ठ नागरिकांचा हिरमोड झाला आहे.

## इंधन दरवाढ आणि ढासळत्या अर्थव्यवस्थेवरुन काँग्रेस आक्रमक; मोदी सरकारवर टीकास्त्र

नवी दिल्ली दि.२३ (वृत्तसंस्था)– केंद्र सरकारने शनिवारी पुन्हा एकदा (तिसऱ्यांदा) पेट्रोल–डिझेलच्या दरात वाढ केल्यानंतर काँग्रेसने मोदी सरकारवर जोरदार टीका केली. भारतातील सामान्य ग्राहकांचे महागाईपासून संरक्षण करण्यात केंद्र सरकार अपयशी ठरत असल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे. तसेच ऊर्जा धोरण आणि परराष्ट्र संबंध ज्या पद्धतीने केंद्र सरकार हाताळत आहे, त्यावरही काँग्रेसने प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते राजीव गौडा आणि प्रवक्त्या डॉली शर्मा यांनी आज दिल्ली येथे पत्रकार परिषद घेतली. इंधन दरवाढ करून महागाईला चालना देण्याऐवजी केंद्र नागरिकांना वाढत्या किमतींपासून वाचवणे हे सरकारचे नैतिक आणि आर्थिक कर्तव्य आहे. केंद्र सरकार आर्थिक आणि राजनैतिक अशा दोन्ही पातळ्यांवर अपयशी ठरले आहे, असे राजीव गौडा म्हणाले.

राजीव गौडा यांनी यावेळी मोदी सरकारला चार प्रश्न विचारले आहेत.

१) २०१४ पासून कच्च्या तेलाचे दर कमी असताना मोदी सरकारने त्याचा फायदा भारतीय ग्राहकांना का होऊ दिला नाही?

२) आपण कच्च्या तेलाच्या पुरवठ्यात विविधता का आणली नाही.

३) मोदी सरकार भारताच्या जनतेची फसवणूक का करत आहे?

४) वाढती महागाई, दरवाढ आणि मंदावलेली अर्थव्यवस्था हाताळण्यासाठी सरकार काय करत आहे?

२०१४ पासून कच्च्या तेलाच्या किमतीत घसरण झाली होती. तेव्हा त्याचा फायदा तुम्ही भारतीय ग्राहकांना का दिला नाही? असा प्रश्न गौडा यांनी सरकारला विचारला. सार्वजनिक आणि खासगी क्षेत्रातील तेल कंपन्यांना प्रचंड नफा कमावण्याची परवानगी देण्यात आली. तर दुसरीकडे सामान्य ग्राहकांना मात्र इंधनाचे वाढीव दर मोजावे लागत आहेत, असा आरोप गौडा यांनी केला.

भारताला लागणाऱ्या इंधनापैकी जवळपास ८० टक्के कच्चे तेल आयात करावे लागते. जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत चढउतार आल्यानंतर आपल्याला भोगावे लागतात. त्यात केंद्र आणि राज्य सरकारांनी लादलेला कर आणि चलनातील चढ–उतार यामुळे किरकोळ इंधनाच्या किमतींवर अनेकदा परिणाम होतो. आंतरराष्ट्रीय स्तरावर कच्च्या तेलाच्या किमती कमी असतानाही भाजपाप्रणीत सरकारने पेट्रोल–डिझेलवरील उत्पादन शुल्क वाढवले, असा आरोप विरोधी पक्षांनी केला.

गौडा यांनी केंद्र सरकारच्या ऊर्जा धोरणावर टीका केली. आंतरराष्ट्रीय तेल पुरवठादारांशी व्यवहार करताना भारताने आपल्या सार्वभौमत्वाशी तडजोड केल्याचा आरोप त्यांनी केला. सरकार अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या पसंतीनुसार तेल आयात करण्याचा निर्णय घेत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

ट्रम्प यांच्या दुसऱ्या कार्यकाळात अमेरिकेने लादलेल्या निर्बंधांनंतर भारताने इराणकडून होणारी कच्च्या तेलाची आयात लक्षणीयरित्या कमी केल्याचा उल्लेख केला. तसेच रशियाकडून ज्या पद्धतीने आयात केली जाते, त्या धोरणावरही टीका केली. भारत आपल्या ऊर्जाविषयक हितांचा स्वतंत्रपणे विचार करण्याऐवजी परवानगी मागत आहे, असाही आरोप गौडा यांनी केला.

राजीव गौडा यांनी तिसऱ्या प्रश्नात मोदी सरकारने अर्थव्यवस्थेची स्थिती आणि महागाईबाबत जनतेची दिशाभूल केल्याचा आरोप केला. ‘‘सर्व काही चांगले चालले आहे, असे सांगून तुम्ही भारतातील जनतेची सातत्याने फसवणूक केली. त्यांनी मतदान करताच तुम्ही त्यांच्या पाठीत खंजीर खुपसत आहात’’, असा आरोप गौडा यांनी केला.



वाढती महागाई आणि ढासळलेली अर्थव्यवस्था ठीक करण्यासाठी आताच्या आता पावले उचला, असे आवाहनही गौडा यांनी चौथ्या प्रश्नाच्या माध्यमातून केले आहे. ‘‘वाढत्या इंधन दरामुळे महागाईच्या परिणामापासून नागरिकांना दिलासा देण्यासाठी सरकारने ठोस उपाययोजना राबवायला हव्यात. चलनवाढ, महागाई आणि अर्थव्यवस्थेची मंदावलेली गती रोखण्यासाठी सरकार काय करत आहे?’’, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

हा सगळा दोष पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा आहे. त्यांनीच यात काहीतरी करणे गरजेचे असून ही समस्या आताच्या आता सोडवावी लागेल, असेही ते म्हणाले.

प्रवक्त्या डॉली शर्मा यांनी देशात उसळलेल्या महागाईची यादीच दिली. दूध, धान्याचे पीठ, तांदूळ, तूरडाळ, भाज्या आणि खाद्य तेल यांच्यात किती टक्के दर वाढ झाली आहे, याची माहिती त्यांनी दिली. देशात भीषण महागाईने टोक गाठलेले असताना सरकार फक्त पीआर करण्यात व्यस्त आहे, असाही आरोप त्यांनी केला.

मोदी सरकार आणि त्यांचे नेते केवळ दुसऱ्या देशांचे उदाहरण देऊन बाता मारतात. पण भारतात महागाई कमी का होत नाही, याबद्दल ते काहीही बोलत नाहीत. सामान्य माणसाला रोजचे जगणे अवघड झाले आहे. देशात सार्वजनिक वाहतूक व्यवस्था कोलमडली आहे. टॅक्सी, ऑटो चालक संपावर गेले आहेत. लोकांना कर्ज काढून घर चालवावे लागत आहे, त्यामुळे त्यांचे भविष्य अंधारमय झाले आहे, अशी परिस्थिती डॉली शर्मा यांनी मांडली.

## पेट्रोल–डिझेलच्या दरात तिसऱ्यांदा वाढ, पेट्रोल १०८.४५ तर डिझेल ९५.०२ रुपयांवर

नवी दिल्ली दि.२३ (वृत्तसंस्था)– पंतप्रधान नरेंद्र मोदी तमाम देशवासियांना आगामी काळात इंधनाचा वापर जपून करण्याचे कळकळीचे आवाहन केल्यानंतर अनेकांना भविष्यातील आर्थिक अरिष्टाची चाहूल लागली होती. ही भीती आता खरी ठरताना दिसत असून पेट्रोल आणि डिझेलच्या दरात आता तिसऱ्यांदा वाढ करण्यात आली आहे. सर्वप्रथम १५ मे रोजी पेट्रोलच्या दरात ३ रुपये आणि डिझेलच्या दरात ३.११ रुपयांची घसघशीत वाढ करण्यात आली होती. त्याला चार दिवस उलटत नाही तोच २० मे रोजी पेट्रोल आणि डिझेलच्या दरात दुसऱ्यांदा वाढ झाली आहे. त्यावेळी पेट्रोलच्या दरात ८६ पैसे आणि डिझेलच्या दरात ८३ पैशांची वाढ करण्यात आली होती. त्यानंतर शनिवारी सकाळपासून पेट्रोल आणि डिझेलच्या दरात तिसऱ्यांदा वाढ झाली. त्यानुसार पेट्रोलचा प्रतिलीटर दर ८७ पैसे आणि डिझेलची प्रतिलीटर किंमत ९१ पैशांनी वाढले आहेत. त्यामुळे मुंबईत पेट्रोलचा प्रतिलीटर दर १०८.४५ रुपयांवर पोहोचला आहे. तर डिझेलचा प्रतिलीटर दर ९५.०२ रुपयांवर पोहोचला आहे. राज्यातील प्रत्येक शहरामध्ये पेट्रोल आणि डिझेलच्या दरात काही तफावत आहे. तर दिल्लीत सीएनजीच्या दरात एका रुपयाने वाढ झाली आहे. दिल्लीत आता सीएनजीचा प्रतिकिलो दर ८१.०९ रुपयांवर जाऊन पोहोचला आहे.

इराण विरुद्ध अमेरिका–इस्रायल युद्धामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर खनिज तेलाचे दर कडाडले आहेत. त्यामुळे भारतीय पेट्रोलियम कंपन्यांना मोठा तोटा सहन करावा लागत होता. पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुका संपताच केंद्र सरकारने यापैकी काही भार सर्वसामान्यांवर टाकायचे ठरवले असून त्यामुळे पेट्रोल आणि डिझेलच्या भावात वाढ झाली आहे. अवघ्या आठ ते नऊ दिवसांमध्ये तिसऱ्यांदा पेट्रोल आणि डिझेलचे दर वाढल्याने सर्वसामान्यांची चिंता वाढली आहे. आगामी काळात खनिज तेलाचे दर वाढून पेट्रोलियम कंपन्यांचा तोटा कायम राहिल्यास पेट्रोल आणि डिझेलचे दर आणखी वाढण्याची शक्यता आहे. दरम्यान, राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये पेट्रोल आणि डिझेलची टंचाई जाणवत आहे.

## डोनाल्ड ट्रम्प यांच्या मुलीच्या हत्येचा कट उघड; इराणचा दहशतवादी ताब्यात

वॉशिंग्टन दि.२३ (वृत्तसंस्था)– अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची कन्या इव्हान्का ट्रम्प यांना इराणच्या ‘इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड्स कॉर्प्स’ मधील एका प्रशिक्षित दहशतवाद्याने लक्ष्य केल्याची माहिती समोर आली आहे. त्याला १५ मे रोजी अटक करण्यात आली असून अमेरिकेकडे सुपूर्द करण्यात आले आहे.

‘न्यू यॉर्क पोस्ट’च्या वृत्तानुसार, मोहम्मद बकीर साद दाऊद अल–सादी या दहशतवाद्याने इव्हान्का यांना मारण्याची शपथ घेतली होती आणि त्याच्याकडे त्यांच्या फ्लोरिडातील निवासस्थानाचा नकाशाही (ब्ल्यूप्रिंट) होता. इराकी नागरिक असलेल्या अल–सादीने, सहा वर्षांपूर्वी बगदादमध्ये अमेरिकेच्या हल्ल्यात मारले गेलेले त्याचे मार्गदर्शक आणि इराणी लष्करप्रमुख कासिम सुलेमानी यांच्या मृत्यूचा बदला घेण्यासाठी ट्रम्प यांच्या कन्येला लक्ष्य करण्याचा कट रचला होता.

वॉशिंग्टनमधील इराकी दूतावासातील माजी उप–लष्करी अधिकारी एन्तीफाध कानबार यांनी या वृत्तसंस्थेला सांगितले, ‘‘कासिम सुलेमानी मारले गेल्यानंतर, अल–सादी लोकांना सांगत फिरायचा की, ‘ज्याप्रमाणे ट्रम्प यांनी आपले घर उद्ध्वस्त केले, त्याचप्रमाणे ट्रम्प यांचे घर उद्ध्वस्त करण्यासाठी आपल्याला इव्हान्काचा गेम करावा लागेल.’ आता अटकेत असलेल्या या दहशतवाद्याने इव्हान्का यांच्या फ्लोरिडातील घराचा नकाशा दाखवणारा एक फोटो पोस्ट केला होता. या फोटोसोबत त्याने एक संदेशही लिहिला होता, ‘‘मी अमेरिकन लोकांना सांगतो, हे चित्र पहा आणि जाणून घ्या की तुमचे राजवाडे किंवा गुप्तचर यंत्रणा तुमचे रक्षण करणार नाहीत. आम्ही सध्या पाळत ठेवणे आणि विश्लेषणाच्या टप्प्यात आहोत. मी तुम्हाला सांगितले होते, वेळ आली की आम्ही बदला घेऊ.’’

## पेट्रोल–डिझेलच्या मागणीत ३०% वाढ; काहीतरी गडबड असण्याची शक्यता; देवेंद्र फडणवीसांनी व्यक्त केली शंका

शिर्डी दि.२३ (प्रतिनिधी)– राज्यात वाढत्या इंधन टंचाईच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्तांना तातडीच्या सूचना दिल्या आहेत. शेतकऱ्यांना आवश्यक तेवढे डिझेल वेळेत उपलब्ध करून द्यावे आणि त्यांच्या कामात कोणताही अडथळा येऊ देऊ नये, असे स्पष्ट निर्देश त्यांनी प्रशासनाला दिले. ग्रामीण भागात पेट्रोल आणि डिझेल मिळत नसल्याबाबत माध्यमांनी प्रश्न उपस्थित केल्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी यासंदर्भात सरकार गंभीर असल्याचे सांगितले. शेतकऱ्यांच्या नावाखाली कुणी इंधनाची साठेबाजी करत असेल, तर त्यावर कडक लक्ष ठेवण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या आहेत.

शिर्डी येथे प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना मुख्यमंत्री म्हणाले की, काही भागांत पेट्रोल आणि डिझेलच्या मागणीत अचानक २० ते ३० टक्क्यांनी वाढ झाली आहे. दरवर्षी किती इंधन लागते याचा अंदाज प्रशासनाला असतो, मात्र अचानक इतकी वाढ होत असेल तर त्यामागे काहीतरी गडबड असण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना इंधन मिळावे आणि साठेबाजीला आळा बसावा यासाठी उपाययोजना सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. काही जिल्ह्यांत वाहनांचे आरसी बुक तपासून डिझेल देण्याची पद्धत सुरू करण्यात आली असल्याची माहितीही त्यांनी दिली.

## कॉक्रोच जनता पार्टीच्या एक्स, इन्स्टाग्रामनंतर आता वेबसाईटही बंद

नवी दिल्ली दि.२३ (वृत्तसंस्था)– गेल्या सात ते आठ दिवसांमध्ये संपूर्ण सोशल मिडिया आणि राजकीय वर्तुळात खळबळ उडवून देणाऱ्या अभिजीत दिपके यांच्या कॉक्रोच जनता पार्टीवर आणखी एक मोठी कारवाई करण्यात आले आहे. कॉक्रोच जनता पार्टीचे अधिकृत संकतेस्थळ बंद केले आहे. या संकेतस्थळावर येऊन कॉक्रोच जनता पार्टीमध्ये सहभागी होण्यासाठी नोंदणी करता येत होती. मात्र, गेल्या दोन ते तीन दिवसांमध्ये आधी कॉक्रोच जनता पार्टीचे एक्स अकाऊंट आणि नंतर इन्स्टा अकाऊंट बंद करण्यात आले होते. एक्स आणि इन्स्टाग्राम अकाऊंटवर कॉक्रोच जनता पार्टीला तुफान प्रतिसाद मिळाला होता. अवघ्या काही दिवसांमध्ये या दोन्ही समाज माध्यमांवर कॉक्रोच जनता पार्टीचे लाखो सदस्य झाले होते. मात्र, कॉक्रोच जनता पार्टीचे एक्स अकाऊंट, इन्स्टा आणि आता वेबसाईट बंद झाल्याने त्यांना संबंधित यंत्रणांनी मोठा झटका दिला आहे. यावर कॉक्रोच जनता पार्टीचे प्रमुख अभिजीत दिपके काही प्रतिक्रिया देणार किंवा पाऊल उचलणार का, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

कॉक्रोच जनता पार्टीचे इन्स्टा आणि ट्विटर अकाऊंट बंद झाल्यानंतर त्यांच्या समर्थकांनी निदर्शने करण्याचा इशारा दिला होता. मात्र, अभिजीत दिपके यांनी आपल्या समर्थकांना ही चूक टाळण्याचा सल्ला दिला होता. तसेच तशी कोणतीही निदर्शने झाल्यास त्याच्याशी आपला संबंध नसल्याचे स्पष्ट केले होते. समर्थकांनी घाईघाईने कोणताही चुकीचा निर्णय घेऊ नये. ज्यामुळे आपल्या चळवळीवर परिणाम होईल. सरकारला आपण एक चूक करावी, हेच हवं आहे. त्यामुळे आपण तसं करु नये. ही मोठी लढाई आहे आणि आपल्याला काळजी घ्यावी लागणार आहे, असे अभिजीत दिपके यांनी म्हटले होते.

अभिजीत दिपके आणि त्यांच्या कॉक्रोच जनता पक्षाबाबत लोकांमध्ये फार जास्त उत्सुकता आहे त्याचे वेगळे प्रतिसाद घराजवळ उमटू नये म्हणून पोलीस संरक्षण घेऊन दक्षता घेतली जात असल्याची माहिती पोलीस उपायुक्त पंकज अंतुलकर यांनी दिली. पुढील काही दिवस त्यांच्या घराला सुरक्षा कायम राहील, असे पोलीस आयुक्तांकडून सांगण्यात आले.

## गुंजेवाहीतील हल्लेखोर वाघिणीसह तीन बछड्यांना जेरबंद करण्याची तयारी; वन विभागाची मोहीम सुरू

चंद्रपूर दि.२३ (प्रतिनिधी)– सिंदेवाही तालुक्यातील गुंजेवाही जंगल परिसरात चार महिलांचा बळी घेणाऱ्या वाघिणीसह तिच्या तीन बछड्यांना जेरबंद करण्यासाठी वन विभागाने हालचाली वेगाने सुरू केल्या आहेत. घटनास्थळी लावण्यात आलेल्या लाईव्ह आणि स्टील कॅमेऱ्यांमध्ये वाघिणीचे कुटुंब कैद झाले असून, त्यांना बेशुद्धीकरणाचे इंजेक्शन देऊन पकडण्याचा प्रस्ताव वन विभागाने तयार केला आहे.

गुंजेवाही जंगल परिसरात तेंदूपत्ता संकलनासाठी गेलेल्या कवडूबाई दादाजी मोहुर्ले (४५), अनुबाई दादाजी मोहुर्ले (४६), संगीता संतोष चौधरी (३६) आणि सुनीता कौशिक मोहुर्ले (३३) या चार महिलांचा वाघिणीच्या हल्ल्यात मृत्यू झाला होता. या घटनेनंतर संपूर्ण परिसरात भीती आणि दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. घटनेनंतर वन विभागाने तातडीने परिसरात शोधमोहीम सुरू केली. सिंदेवाही वनपरिक्षेत्र अधिकारी अंजली सायंकर यांनी सांगितले की, ज्या परिसरात घटना घडली त्या भागात वाघिणीसह तिच्या तीन बछड्यांचा सातत्याने वावर आढळून आला आहे. या पार्श्वभूमीवर वाघिणीला तिच्या बछड्यांसह जेरबंद करण्यासाठीचा प्रस्ताव तयार करण्यात आला असून तो नागपूर येथील प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) कार्यालयाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात येणार आहे.

## उष्णतेची लाट कायम राहिली तर शाळा १५ जून नव्हे २६ जूनपासून सुरु होणार

### शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांचे संकेत

मुंबई दि.२३ (प्रतिनिधी)– हवामान विभागाने वर्तविलेल्या अंदाजानुसार सध्या संपूर्ण विदर्भात सूर्य अक्षरशः आग ओकत आहे. उन्हाचा पारा सातत्याने वाढू लागल्याने विदर्भातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. या वाढत्या तापमानाचा आणि उष्णतेच्या लाटेचा थेट फटका शालेय विद्यार्थ्यांना बसू नये, म्हणून राज्य सरकारकडून एक मोठा निर्णय घेतला जाण्याची शक्यता आहे. १० जूननंतरही विदर्भातील उष्णतेची लाट अशीच कायम राहिली, तर नेहमीप्रमाणे १५ जून रोजी सुरू होणाऱ्या शाळा यंदा थेट २६ जून रोजी सुरू करण्याबाबत सरकार विचार करत असल्याची माहिती गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांनी दिली आहे. या संदर्भात शालेय शिक्षण विभाग लवकरच एक महत्त्वाची बैठक घेऊन परिस्थितीचा सविस्तर आढावा घेणार असल्याचे देखील त्यांनी सांगितले.

विदर्भातील चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रह्मपुरी हे सध्या देशातील सर्वाधिक उष्ण शहर ठरले आहे. ब्रह्मपुरीत नुकतीच ४७.२ अंश सेल्सिअस एवढ्या विक्रमी तापमानाची नोंद झाली आहे. हवामान विभागाने पुढील दोन दिवस विदर्भात उष्णतेचा तडाखा असाच कायम राहण्याचा अंदाज वर्तवला असून, अकोला, अमरावती आणि वर्धा या जिल्ह्यांसाठी रेड अलर्ट जारी केला आहे. तर नागपूर आणि यवतमाळ जिल्ह्यांसाठी ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. संभाव्य उन्हाचा तडाखा लक्षात घेता नागरिकांनी दुपारच्या वेळेत कामाशिवाय बाहेर पडणे टाळावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

या गंभीर परिस्थितीवर बोलताना मंत्री पंकज भोयर म्हणाले की, ‘‘दिवसेंदिवस तापमान सातत्याने वाढत आहे. १० जून नंतर देखील विदर्भात उष्णतेची लाट सुरु राहिली तर विदर्भात १५ जूनपासून सुरु होणाऱ्या शाळात २६ जूनला सुरु करण्यावर सरकार विचार करेल. शालेय शिक्षण विभाग लवकरच यावर बैठक घेऊन याचा आढावा घेणार आहे.

या संदर्भात लवकर निर्णय घेऊ, असे त्यांनी म्हटले. तर, नागपूर विद्यापीठात सर्व परीक्षा सकाळच्या सत्रात घेतल्या जाणार आहेत. सोबतच केंद्रांची संख्या देखील वाढविण्यात येणार असल्याचे पंकज भोयर यांनी सांगितले आहे.

## पुढील ३ ते ४ दिवस मान्सूनच्या प्रवासासाठी वातावरण अनुकूल, भारतीय हवामान विभागाचा अंदाज

नवी दिल्ली दि.२३ (वृत्तसंस्था)– भीषण उकाड्याने आणि वाढत्या तापमानाने हैराण झालेल्या नागरिकांसाठी अत्यंत दिलासादायक आणि आनंदाची बातमी समोर आली आहे. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या ताज्या माहितीनुसार, आज २३ मे रोजी नैऋत्य मान्सूनने नैऋत्य अरबी समुद्र, आग्नेय अरबी समुद्र, कोमोरिन परिसर तसेच बंगालच्या उपसागराच्या आणखी काही भागांत यशस्वी प्रगती केली आहे. हवामान खात्याच्या माहितीनुसार, पुढील ३ ते ४ दिवसांत मान्सून आणखी वेगाने पुढे सरकण्यासाठी अत्यंत अनुकूल आणि पोषक परिस्थिती निर्माण झाली आहे. या आगामी काळात नैऋत्य व आग्नेय अरबी समुद्र, कोमोरिन क्षेत्र, बंगालच्या उपसागराचा आणखी मोठा भाग आणि उर्वरित अंदमान समुद्र मान्सूनच्या कक्षेत येण्याची दाट शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

यंदा नैऋत्य मान्सून वेळेआधीच केरळात दाखल होण्याची शक्यता आहे. सामान्यत: १ जूनच्या सुमारास पोहोचणारा मान्सून यंदा २६ मे रोजीच केरळ किनारपट्टीवर धडकू शकतो. बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र अधिक सक्रिय झाल्याने मान्सूनचा वेग वाढला आहे. विशेष म्हणजे, यंदा मान्सूनच्या सुरुवातीच्या टप्प्यात बंगालच्या उपसागरात किंवा अरबी समुद्रात कोणतेही चक्रीवादळ निर्माण झालेले नाही. त्यामुळे मान्सूनच्या प्रवासात कोणताही मोठा अडथळा येणार नसून तो सुरळीत पुढे सरकणार असल्याचे हवामान विभागाने स्पष्ट केले आहे.

## चीनमध्ये कोळसा खाणीत भीषण गॅस स्फोट; ८२ कामगारांचा मृत्यू

शांक्सी दि.२३ (वृत्तसंस्था)– चीनमधील एका कोळशाच्या खाणीत झालेल्या भीषण स्फोटात किमान ८२ जणांचा मृत्यू झाला असून नऊ जण अद्याप बेपत्ता आहेत, अशी माहिती अधिकृत वृत्तांद्वारे समोर आली आहे. गेल्या काही महिन्यांतील या अत्यंत भीषण खाण अपघातानंतर, बेपत्ता कामगारांचा शोध घेण्यासाठी प्रशासनाकडून बचाव कार्य वेगाने सुरू आहे.

शांक्सी प्रांतातील टोंगझोऊ ग्रुपच्या लियुशेन्यू कोळशाच्या खाणीत झालेल्या गॅस स्फोटाच्या ठिकाणाहून मिळालेल्या माहितीनुसार, या अपघातात ८२ जणांचा मृत्यू झाला आहे, असे वृत्त शिन्हुआ या वृत्तसंस्थेने दिले आहे. स्फोट शुक्रवारी संध्याकाळी झाला. हा स्फोट स्थानिक वेळेनुसार शुक्रवारी संध्याकाळी १९:२९ वाजता (११:२९ ) झाला.



वृत्तानुसार, दुर्घटना घडली तेव्हा खाणीत २४७ कामगार कर्तव्यावर होते. बचाव पथके जिवंत राहिलेल्या लोकांचा शोध घेत असल्याने आणि खाणीतील परिस्थितीचा आढावा घेत असल्याने घटनास्थळी बचाव कार्य अजूनही सुरू आहे. ही घटना गेल्या काही महिन्यांतील सर्वात भीषण खाण अपघातांपैकी एक मानली जात आहे.

शिन्हुआने सुरुवातीला केवळ आठ जणांच्या मृत्यूची बातमी दिली होती आणि २०० हून अधिक कामगारांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आल्याचे म्हटले होते. नंतर, मृतांचा आकडा अचानक ८२ पर्यंत वाढला. हा आकडा इतक्या झपाट्याने कसा वाढला याचे स्पष्टीकरण शासकीय माध्यमांनी दिले नाही. अपघातानंतर, चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांनी बचाव पथकांना बेपत्ता झालेल्यांना शोधण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे निर्देश दिले आहेत. अपघातास जबाबदार असलेल्यांना सोडले जाणार नाही, असे त्यांनी सांगितले.

खाणीतील कार्बन मोनॉक्साईडची पातळी लक्षणीयरीत्या वाढली होती. यामुळेच स्फोट झाला असावा, असा अंदाज आहे. अपघाताच्या नेमक्या कारणाचा सध्या तपास सुरू आहे. जिनपिंग म्हणाले की, सर्व क्षेत्रांनी आणि सरकारी विभागांनी या अपघातातून धडा घ्यावा, कामाच्या ठिकाणी सुरक्षिततेबाबत सतर्क राहावे आणि मोठे अपघात टाळण्यासाठी धोक्यांचा सखोल तपास करावा. ते असेही म्हणाले की, चीनमध्ये पावसाळा सुरू झाल्यामुळे पूर प्रतिबंध आणि आपत्ती व्यवस्थापनाकडे विशेष लक्ष देणे महत्त्वाचे आहे.

## आम्हीही घरी जाऊन मुख्यमंत्रिपदासाठी पाठिंबा दिला होता; बच्चू कडूंचं ठाकरेंना प्रत्युत्तर

मुंबई दि.२३ (प्रतिनिधी)– शिवसेना (ठाकरे) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी बच्चू कडू यांच्यावर जोरदार टीका केली होती. बच्चू कडू यांनी काही दिवसांपूर्वी प्रहार जनशक्ती राजकीय पक्ष शिंदेंच्या शिवसेनेत विलीन करत धुनष्यबाण हाती घेतला. या पार्श्वभूमीवर बोलताना उद्धव ठाकरे यांनी म्हटलं होतं की, ‘‘आपल्यातून जो गेला तो देखील जुना शिवसैनिकच होता. घरी बोलावून मंत्री केलं ही माझी चूक होती.’’

उद्धव ठाकरे यांच्या या वक्तव्यानंतर आता बच्चू कडू यांनी प्रतिक्रिया देत उद्धव ठाकरेंना प्रत्युत्तर दिलं आहे. ‘आम्ही देखील त्यांच्या घरी जाऊन उद्धव ठाकरेंना मुख्यमंत्रिपदासाठी पाठिंबा दिला होता. उद्धव ठाकरेंनी मला तेव्हा कॅबिनेट मंत्रिपदाचा शब्द दिला होता, पण देताना राज्यमंत्रिपद दिलं’, असा गौप्यस्फोट बच्चू कडू यांनी केला आहे. ते टीव्ही ९ मराठी या वृत्तवाहिनीशी बोलत होते.

‘‘उद्धव ठाकरे यांच्याकडून अशा वक्तव्याची मला अपेक्षा नव्हती. मला त्यांना एक प्रश्न विचारायचा आहे, तुम्ही आधी मुख्यमंत्री झाले की मी आधी राज्यमंत्री झालो? उद्धव ठाकरे यांनी माझ्या या प्रश्नावर विचार करावा. मला त्यांच्याकडून या उत्तराची अपेक्षा आहे. मला सांगा जेव्हा हे (महाविकास आघाडी) सरकार सत्तेत येण्याच्या हालचाली सुरू होत्या, तेव्हा मुख्यमंत्री नेमकं कोणत्या पक्षाचा होणार? याबाबत सगळीकडे संभ्रम होता. तेव्हा माझ्या पक्षाचे दोन आमदार होते. उलट तेव्हा शिवसेना (ठाकरे) माझ्या विरोधात लढली होती, एवढंच नाही तर माझ्या विरोधात उद्धव ठाकरेंनी सभा देखील घेतली होती’’, असं बच्चू कडू यांनी म्हटलं आहे.

‘‘जेव्हा महाविकास आघाडीचं सरकार सत्तेत येण्याच्या हालचाली सुरू झाल्या, तेव्हा काँग्रेस, राष्ट्रवादी, भाजपा या सगळ्या पक्षांकडून मला ऑफर होत्या. मात्र, तेव्हा एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांची आणि माझी भेट घालून दिली. त्यानंतर मलाही वाटलं की आपण उद्धव ठाकरे यांना पाठिंबा दिला पाहिजे. मग तेव्हा आम्ही देखील त्यांच्या घरी जाऊन मुख्यमंत्री पदासाठी उद्धव ठाकरे यांना पाठिंबा होता’’, असं बच्चू कडू यांनी म्हटलं आहे.

# करियर निवडतांना मुलांची अवस्था गोंधळलेली

पूर्वी दहावी-बारावीचे निकाल जाहीर झाले की ठराविक करियर निवडले जायचे कारण करियर म्हणून निवडायला जास्त विकल्प उपलब्ध नव्हते, पण आताच्या परिस्थितीत घरोघरी पालकांची एकच लगबग सुरू असले ती म्हणजे आता पुढे ॲडमिशन कुठे घ्यायचे, कुठल्या वाटेला जायचे, कोणते करियर आपल्या मुलांसाठी योग्य असेल? विद्यार्थ्यांची देखील तीच तारांबळ उडते. हल्ली करियरच्या इतक्या विविध वाटा उपलब्ध आहेत आणि त्यामुळेच हल्ली बालक आणि पालक दोघेही गोंधळात पडले आहेत.

पूर्वी करियर निवडीचा इतका गोंधळ झालेला आपण बघितला नव्हता पण हल्ली जितके जास्त विकल्प तितका जास्त गोंधळ होता. एका कोर्ससाठी शंभर महाविद्यालय उपलब्ध असतात मग त्यातून नक्की कोणते करियर अणि का निवडायचे हा देखील प्रश्न असतो. शिवाय हल्ली रेग्युल्लर पेक्षा इंटिग्रेटेड विद्यालयात प्रवेश घेणे जास्त पसंत केले जाते. त्यामुळे नक्की आपल्यासाठी काय योग्य आहे या संभ्रमात पालक आणि विद्यार्थी असतो.

सगळ्यांनी आधी हे समजून घेणे आवश्यक आहे की करियर म्हणजे नक्की काय आणि ते निवडताना कोणत्या गोष्टीची काळजी घेतल्यास पुढील मार्ग सुखकर होईल? करियरची निवड चुकीची नसते पण ती निवडल्यानंतर योग्य दिशा न मिळाल्यास नंतर मात्र पश्चातापाची वेळ येते. ज्या गोष्टीमुळे आपल्याला आनंद, समाधान आणि सुखकारक जीवन जगण्या इतपत पैसे मिळतात, जी गोष्ट करताना आपल्याला थकवा जाणवत नाही, कुणी जबरदस्ती आपल्यावर लादल्यासारखे वाटत नाही त्या गोष्टी करिअर म्हणून निवडल्यास पुढे सुखकारक वाटते. कारण मानसिक समाधान आणि शांती या पुढील जीवनामध्ये फार महत्त्वाच्या गोष्टी असतात. पण देखाव्याचे चकमकीत करियर आणि सहज पैसे कसे मिळतील यामुळे किशोरवयीन मुलांना करियर निवडताना ते समजत नाही.

शिक्षण पूर्ण झाल्यावर आपण आपल्या आयुष्यातील दिवसाचे ८-९ तास काम करत असतो आणि अशा वेळेस आपण आपले न आवडते काम करत राहिलो तर जीवनाचा आनंद गमावून बसतो. करियर ही अशी गोष्ट आहे की एकदा घेतलेला निर्णय पुढे जाऊन बदलणे इतके सोपे नसते आणि यामध्ये वेळ आणि पैसे वाया जाऊन मुलांना व त्यांच्या कुटुंबियांना मनस्ताप होतो. त्यामुळे योग्य सल्ला घेऊन करियर निवडणे आणि निवडलेल्या करियरला यशस्वीपणे आनंदात निभावणे फार महत्वाचे असते. यासाठी मुलांच्या आवडीनिवडी, व्यक्तिमत्व, कल आणि त्यांची बुद्धिमता यांची सांगड घालून त्यांना दिशा दाखवणे ही पालकांची मूलभूत जबाबदारी आहे.

हल्लीच्या स्पर्धात्मक युगामध्ये मुलांचा भरपूर गोंधळ झालेला आढळतो, मुलांवर बऱ्याच प्रकारचा दबाव दिसून येतो आणि त्यातच पालकांच्या अपेक्षा, मार्कांची वाढलेली स्पर्धा यामुळेच मुलांवर मानसिक त्रास ओढवतो. म्हणून करियर निवडताना काही गोष्टी विचारात घेतल्या पाहिजेत. मुलांवर कोणत्याही प्रकारची जबरदस्ती न करता त्यांच्या आवडीप्रमाणे करिअर निवडायला पालकांनी मदत करणे आवश्यक असते. आता पूर्वीप्रमाणे परिस्थिती राहिलेली नाही की हुशार विद्यार्थ्यांनी सायन्स निवडावे, मध्यम बुद्धिमत्ता असलेल्या विद्यार्थ्यांनी कॉमर्स निवडावे आणि कमी बुद्धिमत्ता असलेल्या विद्यार्थ्यांनी कला क्षेत्र निवडावे आता हे चित्र बदलले आहे. आता विद्यार्थी आवड असलेल्या क्षेत्रामध्ये उच्चतम शिक्षण घेऊन, उच्च स्तराला जाऊन आणि आपले टॅलेंट वापरून आपल्या आवडीच्या क्षेत्रात भरारी घेऊ शकतात. म्हणून पालकांनी विद्यार्थी केवळ इंजीनियर डॉक्टर व्हावा या अपेक्षा बदलल्या पाहिजेत. हल्ली याच गोंधळामुळे विद्यार्थी आणि पालक यांमध्ये मतभेद होऊन करियर काऊंन्स्लिंग ही संकल्पना जोर धरत आहे. ज्यामध्ये मुलांच्या विविध आयक्यू चाचण्या, ॲप्टिट्यूड टेस्ट, बेन मॅपिंग, डीएमआयटी अशा विविध चाचण्या करून मुलांचा कल ठरवून करिअर निवडीसाठी मार्गदर्शन केले जाते. या चाचण्यांचे निकष खरे असतीलच असे नाही, कारण विद्यार्थ्यांची आवडनिवड, कल, व्यक्तिमत्व या गोष्टी मुलं आणि पालकांनी आपापसात चर्चा करणे अधिक प्रभावीपणे करियर निवडीसाठी उपयुक्त ठरते. बऱ्याचदा मुलांना करियर करायची इच्छा असते; परंतु घरातली आर्थिक परिस्थिती पाहता मुलांना त्यांच्या आवडीचे करियर करणे शक्य होत नाही. बऱ्याचदा मुलांना व पालकांना विविध नवीन क्षेत्रांची माहिती नसल्याने देखील त्यांना करिअरची निवड करणे जमत नाही. हल्ली नृत्य, गायन किंवा चित्रकला यासारख्या सगळ्या क्षेत्रांमध्ये उच्चशिक्षण उपलब्ध आहे जे प्राप्त करून स्वतःचा व्यवसाय करता येतो. त्याचप्रमाणे परदेशामध्ये जाऊन नोकरी सोबतच आपल्या कला देखील सादर करता येतात. जग जवळ आले असल्याने भाषांतर करण्यासाठी जागतिक पातळीवर विविध भाषा येणे देखील एक चांगले करियर विकल्प आहे. त्याचप्रमाणे एनिमेशन, डिजिटल मार्केटिंग, डेटा सायंटिस्ट, डेटा अर्नलिस्ट, इन्फोटेक्नालाजी, सिनेमॅटोग्राफी, व्हिडिओ एडिटिंग, डिजिटल मार्केटिंग, सायबर सिक्युरिटी, आर्टिफिशियल टेक्नॉलॉजी यांसारख्या नवीन नवीन करियरच्या संधीदेखील मुलांसाठी उपलब्ध झालेल्या आहेत. एरोनॉटिकल इंजिनीरिंग, एरोस्पेस इंजिनीरिंग, एव्हिएशन इंडस्ट्रीमधील करियर, ग्राऊंड स्टाफ, डिफफेन्समधील करिअर, फॅशन डिजाइनिंग, इंटेरियर डिझाइनिंग, ब्यूटी निगडित करियर अशा अनेक संधी मुलांना उपलब्ध झालेल्या आहेत. एमबीबीएसला ॲडमिशन मिळाले नाही म्हणून बऱ्याच मुलांचा आणि पालकांचा हिरमोड होतो; परंतु वैद्यकीय क्षेत्रातच विविध पॅरामेडिकल कोर्सेस करून बऱ्याच करियरच्या संधी उपलब्ध असतात.

ज्यांना प्राण्यांविषयी ओढ आहे, आवड आहे ते वेटरनरी डॉक्टर हा देखील पर्याय निवडू शकता. ज्यांचे वक्तृत्व चांगले आहे, स्टेजवर बोलायची भीती वाटत नाही, लोकांशी संवाद साधायला आवडतो त्यांच्यासाठी व्यावसायिक वक्ता किंवा प्रशिक्षक बनणे हा देखील पर्याय उपलब्ध आहे. कोणत्याही व्यवसायाला आपली आवड बनवून त्यातून पैसे कमावणं हे आतां इतकं कठीण राहिलेलं नाही; परंतु हल्लीच्या मुलांना कष्ट करायची वृत्ती नसून सहजपणे पैसे कसे कमावता येतील याकडेच त्यांचा अधिक कल असतो म्हणून हल्लीचा पालक आणि बालक दोघेही गोंधळलेले आहेत. ज्यांची कष्ट करण्याची तयारी असते त्यांना कोणतेही काम करण्याची भीती वाटत नाही आणि त्यातून पैसे कसे कमवायचे हा आपल्या बुद्धिमतेचा भाग असतो. आपली कौशल्य वापरून यातून उत्पन्न तयार करणे आणि आपल्या आवडी जोपासणे हे देखील हल्लीच्या पिढीला जमत नाही आणि त्यामुळे त्यांना मानसिक त्रास होतो. शिवाय मोठमोठी स्वप्न पूर्ण करण्यासाठी होम लोन, कार लोन अशा विविध कर्जामुळे देखील निवडलेल्या करिअरचा आनंद लुटता येत नाही. निवडलेल्या करियरमध्ये आनंद कसा मिळवायचा हे आपल्या हातात असते. निवडलेले करियर यशस्वी बनवणे आणि आनंदी राहणे जमले तर करियरच्या वाटा निवडताना भावनिक पसारा होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे.

# याला बलात्कार म्हणायचे का?

व्यक्तीच्या संमतीशिवाय किंवा बळजबरीने लैंगिक संबंध प्रस्थापित करणे म्हणजे बलात्कार होय. यात पीडित व्यक्ती ही पुरुष किंवा बहुतांशी स्त्री असते. हा एक लैंगिक अत्याचार व कायदेशीर गुन्हा आहे. जर बलात्कार एकापेक्षा जास्त व्यक्तींनी केला, तर मग त्याला 'सामूहिक बलात्कार' म्हणतात. बलात्कार हीन अपराधांच्या श्रेणीत येतो ज्याची शिक्षा आयुष्यभर किंवा मृत्यूपर्यंत होण्याची शक्यता आहे. बलात्काराचे न्यायालयीन अहवाल, सुनावणी आणि दंड वेगळे आहे. बलात्कार गंभीर स्वरूपाचा गुन्हा आहे. बलात्कार स्त्रियांवरच होवू शकतो. शारीरिक रचनेमुळे बलात्कारितेला भयंकर अशा शारीरिक, मानसिक यातनांना तोंड द्यावे लागते. भारतात बलात्कार हा दखलपात्र गुन्हा आहे. सर्वसाधारणपणे हे झाले बलात्कारसंबंधित कायदेशीर विश्लेषण.

आजपर्यंत चित्रपट, कथा, नाटक इत्यादींसारख्या करमणुकीच्या माध्यमातून आपण सगळ्यांनी बलात्काराचे प्रसंग चित्रीकरण केलेले पाहिलेले आहेत. एखादी स्त्री तीव्र प्रतिकार करीत असताना आरडा-ओरडा करीत असताना, जिवाच्या आकांताने ओरडत असताना, मदतीची याचना करीत असताना, एका किंवा अनेक पुरुषांनी तिच्याशी झटापट करून, बळजबरी करून, तिला शारीरिक दृष्टीने इजा करून, तिच्याशी शारीरिक संबंध प्रस्थापित करण्याचा एकतर्फी प्रयत्न करणे म्हणजे बलात्कार असेच या चित्रिकरणांमधून सर्वसाधारणपणे पहायला मिळालेले आहे. वर नमूद केलेल्या सविस्तर माहितीनुसार कायद्यानेदेखील बलात्काराची व्याख्या, संबंधित आरोपी आणि फिर्यादी व्यक्तीमधील सर्व घटनाक्रम, प्रसंग, त्यावेळची परिस्थिती, पुरावे, साक्षीदार आणि न्यायालयात चाललेला युक्तिवाद यानुसार बलात्कार या घटनेकडे विविध दृष्टिकोनांतून, विविध उदाहरणे अभ्यासून कालानुरूप बदल केलेले आहेत.

चित्रपटातील दृश्य अतिशयोक्ती, अतिरंजित असतात हे जरी खरे असले तरी आपण अनेक प्रत्यक्षात समाजात घडलेल्या बलात्कारच्या केसेसमधून सर्वसाधारण हेच पाहतो आणि ऐकतो की, स्त्रीशी जबरदस्तीने संभोग करण्याचा प्रयत्न म्हणजे बलात्कार! त्यामुळेच या गुन्ह्यासंदर्भातील कायदे अतिशय कडक होऊन, त्यावर ताबडतोब अंमलबजावणी होणे, आरोपीला कठोर शासन होणे यासाठी आपण सर्वजण व आपला समाज आग्रही असतो. या संदर्भातील कलम, कायदे यांवर अनेक मतमतांतरे असून त्यात सातत्याने सुधारणा केली जात असते. प्रत्येक पीडित स्त्रीच्या चारित्र्य, आत्मसमान, प्रतिमा, प्रतिष्ठा, इज्जत आणि पूर्ण आयुष्याला कलाटणी देणारा असा हा संवेदनशील विषय आहे. त्यामुळे या परिस्थितीमधून जाणाऱ्या प्रत्येक पीडित मुलीला, महिलेला न्याय मिळणे तिचा हक्क आणि अधिकार आहे.

परंतु समुपदेशनाला आलेल्या काही प्रकरणांमध्ये असे जाणवते की, अनेक महिलांना बलात्काराची केस एक हत्यार वाटते. अतिशय सहजासहजी एखाद्या पुरुषाला बदनाम करण्यासाठी बलात्कार हा शब्दप्रयोग महिला करताना दिसतात. एखाद्या पुरुषावर बलात्काराची तक्रार करणे, त्यातून त्याला शिक्षा होण्याची इच्छा ठेवणे, त्याचे कुटुंब बरबाद करणे व त्याचा बदला घेणे, त्याला उद्ध्वस्त करणे हेच जणू अशा महिलांचे ध्येय असते आणि का तर कायदे महिलांच्या बाजूने आहेत! अशा केसमध्ये महिलेला सहानुभूती मिळेल, लढण्यासाठी सर्व सहकार्य पाठिंबा मिळेल, अशी तिची धारणा असते.

विवाहबाह्य संबंध असलेल्या महिला, एकापेक्षा जास्त परपुरुषाशी संबंध ठेवणाऱ्या महिला, अथवा अविवाहित तरुणी अथवा महिला, विधवा आणि घटस्फोटित महिला या कायद्याचा सर्रास दुरुपयोग करताना दिसतात आणि त्यानुसार मार्गदर्शन, सल्ले मागायलादेखील येतात. जोपर्यंत एखाद्या पुरुषाशी स्वतःचे सुरू असलेले अनैतिक शारीरिक संबंध गोडीत आहेत, दोघांमध्ये सर्व काही समझोत्याने सुरू आहे, समोरील पुरुष आपल्या सर्व मागण्या पूर्ण करतोय तोपर्यंत या महिला अतिशय आनंदाने, स्वखुशीने वर्षांनुवर्षे त्याच्यासोबत सर्व प्रकारचे संबंध प्रस्थापित करून असतात; परंतु कोणत्याही कारणास्तव हे संबंध डळमळीत होऊ लागले, समोरून मिळणारे शारीरिक, मानसिक, आर्थिक लाभ बंद होऊ लागले की, या स्त्रीसाठी प्रियकर बलात्कारी होऊ लागतो.

पुरुषाकडून त्याच्या घरी हे संबंध लक्षात आले म्हणून, त्याचे मन भरले म्हणून अथवा दुसरी मैत्रीण भेटली म्हणून अथवा अन्य कोणत्याही विषयावरून दोघांत काही कारणास्तव वाद झाले म्हणून हे संबंध संपवण्याचा प्रयत्न केला जातो. जेव्हा महिलेशी असे तात्कालिक, गंमत म्हणून, चेंज म्हणून अथवा गरजेपोटी निर्माण केलेले संबंध पुरुषांना संपुष्टात आणायचे असतात, त्यावेळेस पुरुष तिला टाळणे, तिला इमोशनल करून त्याची मजबुरी सांगणे, तिला प्रेमात करण्याच्या त्यागाच्या मोठ-मोठ्या कहाण्या सांगून तिचं मन, मतपरिवर्तन करण्याचा प्रयत्न करतो. कालांतराने तिच्याशी अबोला धरणे, स्वतःची वर्तवणूक बदलणे, तिच्या फोन, मेसेजला उत्तर न देणे, हे सर्व उपाय पुरुष करून पाहतात. प्रकरण गळ्याशी येऊ शकते, समोरील महिला आपल्या कंट्रोलच्या बाहेर जाऊ शकते, या भीतीने पुरुष बचावाचा पवित्रा घेतात. कोणत्याही कारणास्तव जर पुरुष संबंधित महिलेला असे अपमानित करून, अचानक झिडकारू लागला, तर तिची मानसिक स्थिती बिघडणे स्वाभाविक आहे. हे सर्व प्रकार करूनही जर संबंधित महिला आपल्याला सहजासहजी सोडत नाही किंवा सोडणार नाही हे लक्षात आल्यावर तिला स्वतःच्या कुटुंबीयांमार्फत, मित्रांमार्फत समजावण्याचा प्रयत्न पुरुषांमार्फत केला जातो. महिलेकडे दोघांमधील संबंधांचे काही पुरावे असतील, तर तिच्यावर दबाव आणून वेळप्रसंगी तिला धमकावून हे पुरावे नष्ट करण्याबाबत सांगितले जाते.

यामुळे महिला कितीही व्यथित झाली तरी अशा परिस्थितीमध्ये संबंधित महिलेकडे कोणतेही कायदेशीर पाठबळ, पुरावा या पुरुषावर हक्क अधिकार सांगण्यासाठी नसतो. अशा प्रकारचे संबंध शक्यतो एकमेकांना आधीच सर्व खरं सांगून, ठेवले गेलेले असल्यामुळे दोघेही अथवा एकजण विवाहित असूनसुद्धा ठेवलेले असतात.

**– मीनाक्षी जगदाळे**

# ताक




**शास्त्रात** ताकाची तुलना अमृताशी केलेली आहे. ताक हे शरीरातील घातक पदार्थ लघवीतून बाहेर काढून शरीरात रोग प्रतिकार शक्ती वाढवण्यास मदत करते. ताकाचे नियमित सेवन केल्याने शरीर बलवान होते. महत्वाचे म्हणजे तीन दिवस इतर काहीही न खाता ताक पीत राहल्यास आपल्या शरीराचे पंचकर्म आपोआप होते आणि शरीरातील चरबीचे प्रमाण कमी होते इतकेच नव्हे तर चेर्हयावरील काळे डाग जावुन चेहरा तरतरीत व तेजस्वी होतो.

ताकात विटामिन '१२', कैल्शियम, पोटेशियम आणि फास्फोरस सारखी तत्व असतात जी शरीरासाठी फारच फायद्याची असतात. ज्यांचे पोट साफ होत नाही आणि पोटातून आवाज येतात त्यांनी ताक पिल्याने असे आजार नाहीसे होतात. ताक प्यायल्यानंतर शरीराची झीज ९० ज्ञब भरून निघून शरीरातील उष्णता त्वरित कमी होऊन अतिशय शांत झोप लागते. साधारण माणसाने सुध्दा दररोज एक ग्लास ताक पील्याने शरीरातील उष्णता लगेच कमी होते आणि ताकत प्रचंड प्रमाणात वाढते. ताक पिण्याचे हे १० प्रकारचे फायदे जाणून घेऊया आणि कोल्ड्रिंक पिणे थांबूया १) ताक प्यायल्याने लठ्ठपणा कमी होतो.

२) वारंवार लघवीचा त्रास होत असेल तर ताक प्यावे. त्रास कमी होतो.

३) दह्याचे पाणी अथवा ताकाने गुळण्या केल्यास तोंड येणे बरे होते.

४) ताकात ओवा टाकून प्यायल्यास पोटातील जंतू मरुन जातात.

५) ताकात गुळ टाकून प्यायल्यास लघवी करताना होणारी जळजळ बंद होते.

६) थोडी जायफळ पूड ताकात टाकून प्यायल्यास डोकेदुखी कमी होते.

७) रिकाम्या पोटी ताक प्यायल्याने पोटदुखी बरी होते.

८) ताकात गुळ आणि पुदीना व काळी मिरी टाकून प्यायल्यास पित्ताचा त्रास कमी होतो.

९) लहान मुलांना दात येतेवेळी ताक दररोज ४ चमचे असे दिवसभरातून २-३ वेळा दिल्यास दात येताना मुलांना होणारा त्रास कमी होतो.

१०) महत्वाचे म्हणजे तीन दिवस इतर काहीही न खाता ताक पीत राहल्यास आपल्या शरीराचे पंचकर्म आपोआप होते.

ज्यांनी ह्या पूर्वी पैसे देवुन पंचकर्म केलेलं आहे त्यांनी हा प्रयोग करून पहा, तेव्हा लक्षात येईलच.

तुमची तब्बेत ठीक तर होईलच पण पैसाही वाचेल. असे सहा महिन्यात एक वेळ करा, आपणास होणारे भावी मोठे आजार पण टळतील. त्यामुळे होणारा त्रास व औषधी खर्चही वाचेल.

# 'चांगल्या कामाला मुहूर्त कशाला हवा?'

**आपल्या** सणांमध्येच एक प्रकारचं रिलॅक्सेशन आहे. वेळ नाही, आवडत नाही, स्टेटस ला शोभत नाही, सुटी नाही, रजा नाही अशा हजारभर कारणांमुळे अनेकजण सणच साजरे करत नाहीत आणि या रिलॅक्सेशनला मुकतात. 'असा मी असामी' मध्ये पु.ल. म्हणतात, 'होळी पेटल्यानंतर बोंबलावयास लाजणे हा पुरूषार्थ नव्हे, काय समजलास बेंबट्या?' मनात साचलेल्या नकारात्मक भावनांना चारचौघात जाहीरपणे वाट करून देण्याची व्यवस्था होळीपौर्णिमेला करूनच ठेवलेली आहे. पण, आपण ते योग्यप्रकारे स्वीकारूच शकलो नाही.

पतंग उडवणं, रंग खेळणं, श्रावणात झोके घेणं, मेंदी काढणं, मंगळागौर जागवणं, कोजागिरी पौर्णिमेला गच्चीवरचं चांदण्या रात्रीतलं दुग्धपान, वारी, दहीहंडी, गणपतीत कोकणात करतात तो बाल्या डान्स, दशावतारी हे सगळं काय आहे? हे सगळं खरं तर रिलॅक्सेशनच आहे.

सणावाराला किंवा दर गुरूवारी-शनिवारी घरोघरी साग्रसंगीत आरत्या व्हायच्या. चांगल्या १२-१५ आरत्या खड्या स्वरात झांजा-टाळ वाजवत म्हटल्या जायच्या, बाकीचे लोक टाळ्या वाजवत असत. ते काय होतं? ते रिलॅक्सेशनच होतं. आधुनिकतेच्या नावाखाली आपण दिलं सोडून..

दर अंगारकीला घरी अथर्वशीर्षाची सामूहिक सहस्रावर्तनं चालत, नवरात्रात मंत्रजागर असायचा. एका जागी तास-दोन तास बसून एकाग्रतेने अथर्वशीर्ष विशिष्ट स्वरात आणि बेंबीच्या देठापासून खोल स्वर लावून म्हणणं, हे काय होतं? ते रिलॅक्सेशनच होतं. आपण सोडून दिलं. घरच्या चांगल्या परंपरा आधी मोडीत काढल्या आणि आता वर्षातून एक दिवस पावसात भिजत पहाटे रस्त्यावर बसून अथर्वशीर्ष म्हणायला हजारो महिला जमतात. वाईट वाटून घेऊ नका, पण त्यातलं रिलॅक्सेशन जर अनुभवायला मिळत असेल तर ते दररोज घरोघरी का बरं चालत नाही?

नवरात्रातल्या श्रीसूक्ताच्या आवर्तनांमधलं रिलॅक्सेशन मी अनुभवलंय आणि आजही ते अनुभवतोय. सांगली-मिरजेच्या परिसरातले लोक दर पौर्णिमेला नामस्मरण करत नरसोबाच्या वाडीला पायी चालत जातात, अगदी नित्यनेमाने जातात. तेही रिलॅक्सेशनच...!

माझ्या लहानपणी आमच्या घराजवळच्या जक्कलच्या मळ्यात रात्री भजन असायचं. माझ्या बाबा-काकांसोबत मी त्या भजनाला जात असे. तेव्हा टाळ वाजवायला मिळत, म्हणून जायचो. आता त्यातलं रिलॅक्सेशन टेक्निक उमगतंय. नरसोबाची वाडी, औदुंबर, कोल्हापूरची महालक्ष्मी यांच्या पालखी प्रदक्षिणांना अगदी आवर्जून जा आणि त्याचा अनुभव घ्या. ते रिलॅक्सेशनच आहे.

गावोगावची रात्रीची भजनी मंडळं बंद झाली, शारीरिक-मानसिक ताणाचा निचरा करून देणारी वाटच बंद झाली. आता गणपतीची आरती आणि मंत्रपुष्पांजली म्युझिक सिस्टिमवर लावतात. मंगळागौर जागवण्याची कॉन्ट्रॅक्ट्स दिली जाऊ लागली. घरात हौसेनं रूखवत करायचं सोडून विकतच्या गोष्टी केवळ शो म्हणून मांडायला सुरूवात केली. त्याचा क्रिएटीव्हीटी आणि रिलॅक्सेशनचा मूळ गाभाच आपण हरवून टाकला. आपण हे सगळं का सोडतो आहोत, याचा विचार कधी करणार? संक्रांतीच्या आदल्या दिवशी पहाटे तीन वाजल्यापासून मोठमोठ्या रांगोळ्यांच्या पायघड्यांनी रस्ते सुशोभित करण्यात काय सुरेख आनंद मिळतो, ते मी सोलापुरात असताना अनेक वर्ष प्रत्यक्ष अनुभवलंय. शेकडो कलावंत कार्यकर्त्यांसोबत घेतलेला तो आनंदाचा अनुभव आजही मनात ताजा आहे. चैत्रगौर सजवण्यात काय सुंदर रिलॅक्सेशन असतं, हे ती गौर ज्यांनी सजवली आहे, त्यांनाच माहीत. बाकीच्यांना त्यातली गंमत नाही समजणार. आपली संस्कृती आऊटडेटेड झालेली नाही आणि होणारही नाही. आपण तिचा अर्थच समजून न घेता अनेक गोष्टी सोडून दिल्या आणि म्हणूनच मानसिक ताणाच्या विळख्यात अडकलो आहोत. होळी पेटवायची म्हटलं की आपल्याला पर्यावरण आठवतं, रंग खेळायचा म्हटलं की आपल्याला वाया जाणारं पाणी आठवतं, दीपोत्सवात तेलाचा अपव्यय होतो असं वाटतं, ढोलताशात ध्वनिप्रदूषण दिसतं. हे सगळं नेमकं सणावारालाच आठवतं, बाकीच्या कुठल्याच दिवशी यातलं काय आठवतं आपल्याला?

सिग्नल्सना उभं राहिल्यावर गाडी बंद करणं आपल्याला जमत नाही, हॉर्न न वाजवणं आपल्याला जमत नाही, वाढदिवसाच्या दिवशी रात्री बाराला फटाके वाजवू नयेत, हेही आपल्याला जमत नाही. सणावाराच्या, उत्सवाच्या नावाखाली ट्रिपल सीट बसून हॉर्न वाजवत, पेट्रोल जाळत गावभर उंडारताना प्रदूषण होत नाही का? हे तर २४ तास चालणारं प्रदूषण आहे. त्याला कधी कुणी विरोध करताना दिसत नाही. हा कृत्रिम विरोधाभास कशासाठी? आपल्याला एसी किंवा फॉल्स सिलिंग्ज वापरणं कमी करून साधी विजेची बचत करणं जमत नाही आणि आपण सणांमधून होणाऱ्या प्रदूषणाच्या गप्पा मारतो? हाच खरा घोटाळा आहे. विचार करून पहा, मर्म समजून घेण्याचा प्रयत्न करा, पटलं तर पुन्हा नव्यानं सुरूवात करा. चांगल्या कामाला मुहूर्त कशाला हवा?

**– मयुरेश उमाकांत डंके**
मानसतज्ज्ञ, संचालक-प्रमुख,
आस्था काऊन्सेलिंग सेंटर, पुणे.

# मोबाईलमध्ये गुंतलेली मनं...!

**गुगलच्या** माध्यमातून मिळणारं हरेक प्रश्नाचं उत्तर आजच्या नव्या पिढीच्या समस्या सोडविणारं ठरल्याने, आपल्या घरातील वडीलधाऱ्या माणसांचे लाखमोलाचे अनुभव ऐकायलाही आजच्या तरुणाईपुढे रिकामा वेळ नाही, अशी परिस्थिती निर्माण होऊ लागली आहे. पण, या संपर्क यंत्राच्या अधिक आहारी गेल्याचे दुष्परिणाम काय होऊ शकतात हे सुज्ञ तरुणाईने नित्य अनुभवातून शिकले पाहिजे. नाहीतर हे संपर्क यंत्रच खऱ्या आयुष्यातील संबंधांमधील दुरावा ठरू शकेल!

जेव्हा पाहावं तेव्हा मोबाईलमध्ये गुंतलेली तरुणाई आजूबाजूची परिस्थिती, नाती, माणसं यांपासून दुरावणार तर नाही ना, अशी आता भीती वाटू लागली आहे. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत मोबाईलच्या सान्निध्यात राहणारी ही युवा मंडळी मैत्री जपताहेत खरी, पण ती व्हॉट्सॲप, फेसबुकच्या माध्यमातून.. पण, गंमत अशी असते की, व्हॉट्सॲप, फेसबुकवर जीवापाड मैत्रीचा बंध जपणारी ही मंडळी प्रत्यक्षात जेव्हा एकमेकांसमोर येतात तेव्हा ती पूर्णपणे अनोळखी असतात. नात्यांचा हा बंध कुठेतरी हरवलेला दिसून येतो.

बर्थडे किंवा अन्य काही आनंदाच्या बातम्यांच्या शुभेच्छांचा वर्षाव एकमेकांवर करताना प्रत्यक्षात समोरासमोर आल्यावर हस्तांदोलन करून हसतमुखाने एकमेकांना शुभेच्छा देण्याचंही ही मंडळी खरं तर पार विसरून गेलेली असतात.

मग ही नाती खरंच एवढी तकलादू असतात का? शाळेतील एकत्र काढलेले निरोप समारंभाचे फोटो पाहताना, फेसबुकवर एकूण मैत्रीचे धागे उलगडलेले दिसून येतात. त्याला किती लाईक्स येतात, किती कमेंट येतात याचं मोजमाप करताना फोटोतील आपले हे सवंगडी आता कुठे आहेत याचा पत्ताही नसतो, तर प्रत्यक्ष भेट ही क्वचितच नावाला उरलेली असते. इथेच हाय, हॅलो केल्यावर प्रत्यक्षात ती व्यक्ती भेटली काय किंवा प्रत्यक्ष समोरासमोर आल्यावर त्या व्यक्तीशी संवाद नाही झाला काय, काही फरक पडत नाही. नवनवीन ॲप्स डाऊनलोड करून आजची तरुणाई त्यातच मग्न राहताना दिसते. तासन्तास मोबाईलमध्ये गुंतून आपली तहान-भूकही हरपून जाते. आपल्या आजूबाजूला वावरणारी माणसं, कुणी मारलेल्या हाकाही त्यांना ऐकू येत नाहीत. ट्रेनमध्ये दरवाजाला रेलून मोबाईलमध्ये दंग राहणंही घातकच. गर्दीतही गेम खेळणे, मोबाईलवर बोलणे, सेल्फी घेणे आदींमुळे कुठलं स्टेशन आलं याचंही भान उरत नाही. मोबाईल केवळ नजरेसमोर राहतो. आपण समोरच्या माणसाशी मुक्याने संवाद साधतो. हे संवादाचं असं साधन राहिल्यामुळे एकंदरीतच ही परिस्थिती मूक करणारी दिसून येते. मोबाईलच्या नादात रमणारी मनं मोबाईलसोबत हसताना-खेळताना दिसतात. पाच-पाच मिनिटांनी मोबाईल कानाला लावून किंवा चॅटिंगच्या माध्यमातून तासनब तास त्यामध्ये गुंतलेली दिसतात. कानाला हेडफफोन लावून रस्त्यातून चालताना गाणी ऐकण्याचं वेडही अनेक जणांना दिसून येतं. रस्त्यावर चालताना फोनवर बोलणंही तेवढं धोकादायकच आहे. समोरासमोर धडकणारी माणसं, वाहनांचे न येणारे अंदाज, रस्ता ओलांडतानाही गाणी ऐकणे, मोबाईलवरून संवाद साधणे, गेम खेळणे आदी प्रकार अगदी दिवसा-रात्रौ सुरूच असतात. घरामध्ये, रस्त्यावर, चालता-फिरताना, बसमध्ये, ट्रेनमध्ये; तर कधी रेल्वे स्टेशनच्या प्लॅटफॉर्मवर बोलतानाही ही मंडळी बेभान झालेली दिसून येते. याचे धोके वेळीच लक्षात घेऊन यावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. गुगलच्या माध्यमातून मिळणारं हरेक प्रश्नाचं उत्तर आजच्या नव्या पिढीच्या समस्या सोडविणारं ठरल्याने आपल्या घरातील वडीलधाऱ्या माणसांचे लाखमोलाचे अनुभव ऐकायला आजच्या मुलांना रिकामा वेळच नाही, अशी परिस्थिती निर्माण होऊ लागली आहे. हरेक समस्येचं निराकरण करणारा मोबाईल आजच्या पिढीला मंत्रमुग्ध करणारा ठरला आहे. कधी बक्षीस रूपाने, कधी गिफ्ट, कधी स्वबळाची कमाई, तर कधी पहिला पगार म्हणून घेतला जाणारा महागडा मोबाईल.. हा आजच्या पिढीसाठी नित्याचा सोबती बनून राहिला आहे. मित्र-मैत्रिणींमध्ये वावरताना एखाद्याच्या हातात मोबाईल नसेल, तर ते त्यांना कमीपणाचं वाटून जातं आणि अशावेळी आपली हौस म्हणून मोबाईल खरेदी केला जातो. आजची पिढी मोबाईलमुळे संवाद विसरत चालली आहे, असे जाणवते कुठेतरी. टीव्ही पाहताना, अभ्यास करताना, जेवतानासुद्धा मोबाईलशी जुळलेलं नातं हे प्रत्यक्षातील नात्यांमध्ये कुठेतरी दुरावा निर्माण करणारं तर ठरणार नाही ना, अशी भीती आता वाटू लागली आहे. ही भीती नक्कीच गैर ठरणार नाही. संपर्काचं हे तंत्रज्ञान जितकं आवश्यक आहे. तितकं ते आपल्यावर हावी होत नाही ना याचा विचारही तरुणाईने करणंही तितकंच आवश्यक आहे.

फिल्म एज्युकेशन ॲण्ड वेलफेअर फाउंडेशन आयोजित

# ६ व्या रील्स आंतरराष्ट्रीय फिल्म फेस्टिव्हलचा पुरस्कार सोहळा संपन्न

## देश-विदेशातील चित्रपटांचा गौरव!






छत्रपती संभाजीनगर, दि. २३ (प्रतिनिधी) - येथील मौलाना अबुल कलाम आझाद रिसर्च सेंटर येथे '६ वा रील्स इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल २०२६'चा भव्य दिव्य पुरस्कार सोहळा आणि सांस्कृतिक कार्यक्रम प्रचंड उत्साहात रविवार दिनांक १७ मे २०२६ रोजी पार पडला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून नितु कोईराला अभिनेत्री नेपाळ, संजय बनसोडे (अभिनेता ), गायत्री रोनकर महाराष्ट्र ची विरंगाणा व मिस आशिया विजेत्या २०२५, संगीता कायंदे, लक्ष्मी थोरात, तुषार थोरात आयोजक, पाशा खान सीमा खान स्वरांजली संगीत आर्केस्ट्रा संचालक , राजू कांबळे , पोपट थोरात हे उपस्थितीत होते.

या महोत्सवात देश-विदेशातून आलेल्या १८०० प्रवेशिका मधून २५१ उत्कृष्ट चित्रपटांना आणि कलाकारांना मान्यवरांच्या हस्ते मानाचे पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले.

### सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी

पुरस्कार सोहळ्यासोबतच आयोजित करण्यात आलेल्या रंगतदार मनोरंजन आणि सांस्कृतिक कार्यक्रमाने प्रेक्षकांची मने जिंकली. यामध्ये ओडिसा मधील कृष्णा डी के यांच्या ऑडीसी नृत्य क्लाविशराने व महाराष्ट्र लोकनृत्याने अप्रतिम सादरीकरणामुळे संपूर्ण सभागृह टाळ्यांच्या कडकडाटाने दुमदुमून गेले होते.

यावेळी प्रामुख्याने लेबरेशन कॉन्टेक हेअर साऊथ कोरिया, राजू लाडला बुलडाणा भारत, झेप मुबंई भारत , रेड भारत, द मोमेन्ट आफ्टर पिली्फिन्स, गुरुजी नमस्कार केरळ भारत, शिक्षका का अधिकार (RTE) छत्रपती संभाजीनगर भारत यांनी अनुक्रमे व सर्वाधिक पारितोषिक मिळवत ६व्या पुरस्कार सोहळ्यातील अप्रतिम चित्रपट म्हणून यांची निवड करन्याय आली

गेल्या काही महिन्यांपासून चित्रपट वतुर्ळात उत्सुकता निर्माण केलेल्या या म होत्सवाचा सांगता समारंभ रविवारी दुपारी १२:३५ ते सायंकाळी ७:०० या वेळेत संपन्न झाला. या सोहळ्याला चित्रपट क्षेत्रातील नामांकित दिग्दर्शक, कलाकार, तंत्रज्ञ आणि रसिक प्रेक्षकांनी मोठी गर्दी केली होती.

विविध भाषिकांतील चित्रपटांची धूम

या वर्षी महोत्सवाचे हे ६ वे वर्ष असून, जगभरातून शेकडो शॉर्ट फिल्म्स, डॉक्युमेंट्री आणि वैशिष्ट्यपूर्ण चित्रपटांची नोंदणी झाली होती. १५ एप्रिल रोजी जाहीर झालेल्या नामांकनांमधून अंतिम विजेत्यांची निवड करताना ज्युरींना प्रचंड कसरत करावी लागली. सामाजिक संदेश देणाऱ्या चित्रपटांपासून ते व्यावसायिक कौशल्याने नटलेल्या कलाकृतींपर्यंत सर्वच श्रेणींमध्ये चुरस पाहायला मिळाली.

महोत्सवाचे मुख्य आयोजक आणि कला दिग्दर्शक, चित्रपट निर्माते लक्ष्मी थोरात व तुषार थोरात यांनी उपस्थित कलाकारांचे आभार मानले. 'स्वतंत्र चित्रपटांना आणि नवोदित कलाकारांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देणे, हाच या महोत्सवाचा मुख्य उद्देश आहे. यंदाचे ६ वे वर्ष प्रेक्षकांच्या आणि कलाकारांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे कमालीचे यशस्वी ठरले,' अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

हा सोहळा यशस्वी करण्यासाठी रील्स इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हलच्या संपूर्ण टीमने विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रम सूत्रसंचालन महेश माने, गौरी गोजे व आफताफ खान यांनी केले, चित्रपटसृष्टीतील दर्जेदार कलाकृतींना प्रोत्साहन देणारा हा सोहळा छत्रपती संभाजीनगरच्या सांस्कृतिक वैभवात भर घालणारा ठरला, अशा शब्दांत उपस्थितांनी या उपक्रमाचे कौतुक केले.

# राज्यातील रस्ता अपघात मृत्युदरात लक्षणीय घट; परिवहन विभागाच्या उपाययोजनांचे यश

मुंबई, दि. २२ (प्रतिनिधी)- महाराष्ट्रात रस्ता सुरक्षेसाठी परिवहन विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या कठोर आणि तंत्रज्ञानाधारित उपाययोजनांचा सकारात्मक परिणाम दिसून येत असून, राज्यातील प्राणघातक अपघात आणि अपघाती मृत्यूंच्या संख्येत लक्षणीय घट नोंदविण्यात आली आहे. जानेवारी ते एप्रिल २०२६ या कालावधीत राज्यातील प्राणघातक अपघात आणि मृत्यूंची संख्या मागील वर्षाच्या तुलनेत तब्बल ८ टक्क्यांनी कमी झाली आहे.

परिवहन विभागाच्या आकडेवारीनुसार, जानेवारी ते एप्रिल २०२५ या कालावधीत राज्यात १२ हजार ६१० अपघात, ५ हजार २७५ प्राणघातक अपघात आणि ५ हजार ६८१ अपघाती मृत्यू झाले होते. याच कालावधीत २०२६ मध्ये अपघातांची संख्या १२ हजार ३८९ इतकी राहिली असून, प्राणघातक अपघातांची संख्या ४ हजार ८२७ आणि मृत्यूंची संख्या ५ हजार २३३ इतकी नोंदविण्यात आली. परिणामी एकूण अपघातांमध्ये २ टक्के, तर प्राणघातक अपघात आणि मृत्यूंमध्ये प्रत्येकी ४४८ ने घट झाली आहे.

राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये रस्ता सुरक्षा उपाययोजनांमुळे मृत्यूंच्या संख्येत मोठी घट दिसून आली आहे. वाशिम जिल्ह्यात मृत्यूंची संख्या ३७ टक्क्यांनी घटली असून, बीड आणि नागपूर शहरात प्रत्येकी २९ टक्के घट नोंदविण्यात आली आहे. नाशिक शहरात २८ टक्के, नवी मुंबईत १९ टक्के, तर भंडारा, सांगली आणि सातारा येथे प्रत्येकी १७ टक्के घट झाली आहे. बुलढाणा आणि सिंधुदुर्गमध्ये १५ टक्के, तर धाराशिव, नांदेड आणि नंदुरबार येथे १३ टक्क्यांनी मृत्यूदर कमी झाल्याचे आकडेवारीतून दिसून येते.

२०३० पर्यंत राज्यातील रस्ता अपघातांची संख्या ५० टक्क्यांनी कमी करण्याचे उद्दिष्ट परिवहन विभागाने निश्चित केले असून, त्यासाठी व्यापक स्वरूपातील उपाययोजना राबविण्यात येत आहेत. राज्यस्तरासह प्रत्येक जिल्ह्यात स्वतंत्र रस्ता सुरक्षा कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. प्रत्येक जिल्ह्याच्या अपघातांची कारणे आणि स्थानिक गरजा लक्षात घेऊन स्वतंत्र रस्ता सुरक्षा आराखडे तयार करण्यात आले असून त्यांची अंमलबजावणी सुरू आहे.

अपघातप्रवण 'ब्लॅक स्पॉट' सुधारण्यासाठी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून कामे हाती घेण्यात आली आहेत. तसेच राज्यभरात रस्ता सुरक्षा नियमांचे उल्लंघन करणाऱ्या चालकांवर कारवाई करण्यासाठी रडार आणि इंटरसेप्टर वाहनांच्या सहाय्याने ३३२ विशेष पथके कार्यरत करण्यात आली आहेत. हेल्मेट आणि सीटबेल्ट सक्तीच्या अंमलबजावणीसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि रडार तंत्रज्ञानाचा वापर सुरू करण्यात आला आहे.

१ जानेवारी ते ३० एप्रिल २०२६ या कालावधीत रडार आधारित इंटरसेप्टर वाहनांमार्फत मोठ्या प्रमाणावर कारवाई करण्यात आली. हेल्मेट न घालणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध २ लाख ६४ हजार ६७२ प्रकरणे नोंदविण्यात आली, तर मागील आसनावरील हेल्मेटविना प्रवास करणाऱ्यांविरुद्ध ३० हजार ५६८ कारवाया करण्यात आल्या.

अतिवेगामुळे २२ हजार ३६०, सीटबेल्ट न वापरणाऱ्या चालकांविरुद्ध १८ हजार १७२, अवैध पीयूसी प्रकरणांत १८ हजार ९४० आणि विमाविना वाहन चालविणाऱ्या १५ हजार ६३८ चालकांवर कारवाई करण्यात आली. याशिवाय ट्रिपल सीट प्रवास आणि फिटनेस नसलेल्या वाहनांविरुद्धही मोठ्या प्रमाणात दंडात्मक कारवाई करण्यात आली.

वाहनांची तांत्रिक सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी राज्यात ५३ शासकीय आणि १६ खासगी स्वयंचलित वाहन तपासणी केंद्रे (एटीएस) सुरू करण्यात येणार आहेत. तसेच कुशल वाहनचालकांनाच परवाने मिळावेत यासाठी २०२६ मध्ये ३८ स्वयंचलित वाहन चाचणी पथ (एडीटीटी) सुरू करण्यात येत आहेत.

राज्यातील राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग आणि जिल्हा जोडरस्त्यांवर सुमारे २५ हजार किलोमीटर लांबीच्या मार्गांवर आधुनिक वाहतूक व्यवस्थापन प्रणाली (आयटीएमएस) बसविण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर ही प्रणाली मागील वर्षभरापासून कार्यरत असून त्याचा सकारात्मक परिणाम दिसून येत आहे.

अपघातग्रस्तांना 'गोल्डन अवर'मध्ये मदत मिळावी यासाठी तातडीच्या प्रतिसादाचा कालावधी ३० मिनिटांपेक्षा कमी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. सर्व प्रादेशिक आणि उपप्रादेशिक परिवहन कार्यालयांमध्ये वाहन तपासणी व वाहनचालक चाचण्या कॅमेऱ्यांच्या निगराणीखाली पारदर्शक पद्धतीने घेतल्या जात आहेत. शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी नवीन शालेय बस नियमावली तयार करण्यात आली असून, स्थानिक स्तरावर अपघातप्रवण स्थळांच्या दुरुस्तीसाठी निधीही उपलब्ध करून देण्यात येत आहे.

रस्ता सुरक्षा जनजागृतीसाठी ङ्गदुचाकीस्वार व पादचारी वाचवा अभियान २०२६ङ्क ही विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत राज्यातील सर्वाधिक दुचाकी अपघात होणाऱ्या ११० रस्त्यांवर हेल्मेट सक्तीची प्रभावी अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे.

अपघातग्रस्तांना मदत करणाऱ्या 'राहवीर' किंवा 'जीवनदूत' व्यक्तींना केंद्र शासनामार्फत २५ हजार रुपयांचे बक्षीस देण्याची योजना सुरू करण्यात आली आहे. तसेच अपघातग्रस्तांना तातडीने मोफत उपचार उपलब्ध व्हावेत यासाठी ङ्गपीएम राहतङ्क (प्राईम मिनीस्टर - रोड ॲक्सीडेंट व्हिक्टिम हॉस्पिटलायझेशन अँड ॲश्यूरड ट्रिटमेंट योजना राज्यात लागू करण्यात आली आहे.

या योजनेअंतर्गत अपघातग्रस्तांना पहिल्या सात दिवसांसाठी आणि दीड लाख रुपयांपर्यंत कॅशलेस उपचाराची सुविधा उपलब्ध होणार आहे. अपघात झाल्यास ११२ या हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधून रुग्णवाहिका आणि जवळच्या रुग्णालयाची माहिती मिळू शकणार आहे. ईडीएआर आणि टिएमएस २.० या डिजिटल प्रणालींशी योजना जोडण्यात आल्याने उपचार प्रक्रिया आणि निधी वितरण अधिक वेगाने होणार आहे. विमाधारक प्रकरणांत विमा कंपन्या खर्च उचलणार असून, 'हिट अँड रन' किंवा विमाविना प्रकरणांमध्ये शासन खर्च करणार आहे.

अपर परिवहन आयुक्त भरत कळसकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, राज्यातील रस्ता सुरक्षा अधिक प्रभावी करण्यासाठी परिवहन विभाग तंत्रज्ञान, कठोर अंमलबजावणी आणि जनजागृती या त्रिसूत्रीवर भर देत आहे. आगामी काळात अपघात आणि मृत्यूदरात आणखी घट घडवून आणण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असल्याचेही त्यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# राज्यपालांकडून अधिकारी, कर्मचारी यांना दहशतवाद विरोधी प्रतिज्ञा



मुंबई, दि. २३ (प्रतिनिधी) - राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी दहशतवाद विरोधी दिनानिमित्त लोकभवनातील अधिकारी व कर्मचारी यांना दहशतवाद विरोधी प्रतिज्ञा दिली. अहिंसा व सहिष्णुतेच्या परंपरेविषयी दृढ निष्ठा बाळगून सर्व प्रकारच्या दहशतवादाचा व हिंसाचाराचा सर्वशक्तीनिशी मुकाबला करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

दिवंगत पंतप्रधान राजीव गांधी यांचा स्मृतिदिन दहशतवाद विरोधी दिवस म्हणून पाळण्यात येतो.

राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, सहसचिव एस. राममूर्ती, परिवार प्रबंधक डॉ. निशिकांत देशपांडे यांसह लोकभवनातील कर्मचारी व अधिकारी तसेच पोलीस अधिकारी व अंमलदार यावेळी उपस्थित होते.

# 'देऊळ बंद २'चा महाराष्ट्रभर धुमाकूळ! पहिल्याच दिवशी शो हाऊसफुल

मुंबई, दि. २२ (प्रतिनिधी) - महाराष्ट्रभर 'श्री स्वामी समर्थ' नामाचा गजर घुमवत बहुचर्चित मराठी चित्रपट 'देऊळ बंद २ : आता परीक्षा देवाची'ने बॉक्स ऑफिसवर दमदार एन्ट्री केली आहे. २०१३ मध्ये प्रदर्शित झालेल्या सुपरहिट 'देऊळ बंद' या चित्रपटाने श्रद्धा आणि विज्ञान यांच्यातील संघर्ष प्रभावीपणे मांडत प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवलं होतं. तब्बल ११ वर्षांनंतर आलेल्या या सिक्वेललाही प्रेक्षकांचा तितकाच जबरदस्त प्रतिसाद मिळताना दिसत आहे.

विशेष म्हणजे, पारंपरिक शुक्रवारऐवजी चित्रपट गुरुवारी पहाटे ब्रह्ममुहूर्तावर प्रदर्शित करण्यात आला. गुरुपुष्यामृत योग साधत सकाळी ६ वाजताच चित्रपटाचा पहिला शो सुरू झाला आणि पहाटेपासूनच थिएटरमध्ये प्रेक्षकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. राज्यातील अनेक चित्रपटगृहांमध्ये पहिल्याच दिवशी शो हाऊसफुल झाल्याचं चित्र होतं. पुणे, पिंपरी-चिंचवड, मुंबई, नाशिक, जळगाव, विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रात चित्रपटाला मोठा प्रतिसाद मिळत आहे.

'देऊळ बंद २'च्या पहिल्या दिवसाच्या कमाईनेही सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. सॅकनिल्कच्या रिपोर्टनुसार, चित्रपटाने पहिल्याच दिवशी १,१७५ शोजमधून तब्बल २.४५ कोटी रुपयांचे नेट कलेक्शन केले आहे. तर भारतातील एकूण ग्रॉस कलेक्शन २.८९ कोटी रुपयांपर्यंत पोहोचले आहे. मराठी चित्रपटसृष्टीसाठी ही ओपनिंग अत्यंत दमदार मानली जात आहे.

मुंबईतील भांडुप, कल्याण, नालासोपारा, अंधेरी, ठाणे आणि लोअर परळसारख्या मराठीबहुल भागांमध्ये चित्रपटाची प्रचंड क्रेझ पाहायला मिळाली. अनेक थिएटरमधील सर्व शो हाऊसफुल्ल झाले असून तिकीट खिडक्यांवर प्रेक्षकांची गर्दी उसळली होती. 'बुक माय शो'सारख्या ऑनलाईन बुकिंग प्लॅटफॉर्मवरही तिकिटांसाठी मोठी झुंबड उडाल्याचं दिसून आलं.

सोशल मीडियावरही 'देऊळ बंद २'ची जोरदार चर्चा सुरू आहे. चित्रपटातील भावनिक प्रसंग, प्रभावी संवाद, दमदार कथानक, संगीत आणि कलाकारांच्या अभिनयाचं प्रेक्षकांकडून भरभरून कौतुक केलं जात आहे. अनेकांनी हा चित्रपट श्रद्धा, भावना आणि वास्तव यांचा उत्तम संगम असल्याचं म्हटलं आहे.

# जुन्या वाहनांना 'एचएसआरपी' बसविण्यासाठी ३० जून २०२६ पर्यंत अंतिम मुदतवाढ

मुंबई, दि. २३ (प्रतिनिधी) - राज्यातील दिनांक १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या जुन्या वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक (एचएसआरपी) पाटी बसविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने ३० जून २०२६ पर्यंत अंतिम मुदतवाढ दिली आहे. यापूर्वी ही मुदत ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत होती. मात्र, राज्यातील केवळ ५० टक्के जुन्या वाहनांवरच एचएसआरपी बसविण्यात आल्याचे आढळून आल्याने शासनाने ही मुदत वाढविण्याचा निर्णय घेतला आहे.

परिवहन विभागाने दिलेल्या माहितीनुसार, ज्या वाहन मालकांनी निर्धारित मुदतीत एचएसआरपी बसविणार नाही किंवा त्यासाठी आगाऊ वेळ (अपॉईंटमेंट) घेणार नाहीत, अशा वाहनांची १ जुलै २०२६ पासून रस्त्यावर तपासणी करण्यात येणार आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनधारकांकडून मोटार वाहन कायदा व नियमांनुसार एक हजार रुपये तडजोड शुल्क आकारण्यात येणार आहे. वाहन मालकांनी एचएसआरपी बसविण्यासाठी परिवहन विभागाच्या http://transport.maharashtra.gov.inutm_source=chatgpt.com या संकेतस्थळावर जाऊन ३० जून २०२६ पर्यंत ऑनलाईन अपॉईटमेंट घ्यावी, असे आवाहन सह परिवहन आयुक्त (संगणक) शैलेश कामत यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

# कामगार संहितेतील मुद्यावर हरकती व सूचना नोंदवण्याचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर दि.२३ (प्रतिनिधी)- भारत सरकारने २१ डिसेंबर २०२५ पासून देशात नवीन ४ कामगार संहिता अंमलात आणल्या आहेत. याला अनुसरून महाराष्ट्र राज्य शासनाने देखील संबंधित नियमांचा मसुदा अधिसूचना जारी करून प्रसिद्ध केला आहे. या मसुद्यावर संबंधित घटकांनी आपल्या हरकती आणि सूचना दिनांक १२ जून २०२६ पर्यंत नोंदवाव्यात, असे आवाहन छत्रपती संभाजीनगर विभागाचे कामगार उप आयुक्त नितीन पां. पाटणकर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

राज्य शासनाने अधिसूचना प्रसिद्ध करून मसुदा जाहीर केलेल्या ४ कामगार संहिता मध्ये औद्योगिक संबंध संहिता-२०२०,वेतन संहिता-२०१९,व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य व कामाची स्थिती संहिता-२०२०,सामाजिक सुरक्षा संहिता-२०२० याचा समावेश आहे.

या संहितेच्या मसुद्याबाबत औद्योगिक क्षेत्रातील कामगार संघटना, मॅन्युफॅक्चरिंग असोसिएशन, दुकाने व आस्थापना, मालक, असोसिएशन आणि इतर संबंधित घटकांनी आपल्या हरकती किंवा सूचना नोंदवायच्या आहेत. अधिसूचना प्रसिद्ध झाल्यापासून ४५ दिवसांच्या आत म्हणजेच दिनांक १२ जून २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी ई-मेल आयडीवर लेखी स्वरूपात त्या सादर कराव्यात. यासाठी कामगार आयुक्त यांचे कार्यालय, कामगार भवन, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१. ई-मेल आयडी: mh.labourcodes@gmail.com यावर पाठवाव्यात. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या हरकती व सूचनांचा विचार केला जाणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी असे नितीन पाटणकर, कामगार उपायुक्त, छत्रपती संभाजीनगर विभाग यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे स्पष्ट केले आहे.

# नीट पेपर फुटी प्रकरणी दोर्षीना कठोरातले कठोर शासन व्हावे कोचिंग क्लासेस असोसिएशन महाराष्ट्राची मागणी




छत्रपती संभाजीनगर, दि. २३ (प्रतिनिधी) - नीट परीक्षेतील कथित पेपर फुटी प्रकरणामुळे देशभरातील लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी गभीर खेळ झाला असून या प्रकाराबद्दल कोचिंग क्लासेस असोसिएशन महाराष्ट्राच्या वतीने तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. या संदर्भात आयोजित पत्रकार परिषदेत असोसिएशनचे राज्याध्यक्ष डॉ. पी. एम. वाघ यांनी अतिशय कठोर शब्दांत निषेध नोंदवत संबंधित दोषर्षीवर तात्काळ आणि कठोर कारवाई करण्याची मागणी केली.

यावेळी राज्य सरचिटणीस प्रा. ज्ञानेश्वर ढाकणे यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांच्या आयुष्याशी आणि पालकांच्या विश्वासाशी य करणाऱ्या अशा प्रवृत्ती समाजासाठी घातक आहेत. नीटसारख्या राष्ट्रीय स्तरावरील परीक्षेची पारदर्शकता धोक्यात आणणा-य सर्व दोषींना शोधून त्यांच्यावर कठोरातले कठोर शासन करण्यात यावे. तसेच या घोटाळ्यात सहभागी असलेल्या कोणालाही पाठीशी घातले जाऊ नये, अशी ठाम भूमिका असोसिएशनने घेतली आहे.

पत्रकार परिषदेमध्ये पुढील प्रमुख मागण्या करण्यात आल्या : नीट पेपर फ ुटी प्रकरणाची उच्चस्तरीय आणि निष्पक्ष चौकशी करण्यात यावी.

या प्रकरणातील सर्व दोर्षीना तात्काळ अटक करून कठोर शिक्षा देण्यात यावी. विद्यार्थ्यांच्या भविष्यासोबत खेळ करणाऱ्या रॅकेटचा संपूर्ण पर्दाफाश करण्यात यावा. राष्ट्रीय परीक्षा प्रक्रियेमध्ये अधिक पारदर्शकता आणि सुरक्षितता आणण्यासाठी केंद्र सरकारने ठोस उपाययोजना कराव्या. भविष्यात अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी कठोर कायदे आणि नियंत्रण यंत्रणा उभारण्यात यावी. लातूर कोचिंग क्लासेस विषयी कोणताही अधिनियम तयार करत असताना कोचिंग क्लासेस असोसिएशनचा प्रतिनिधी त्यामध्ये असावा.

यावेळी असोसिएशनच्या विविध पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, लाखो मेहनती विद्यार्थ्यांच्या कष्टावर पाणी फ ेरणाऱ्या ३ गैरप्रकारांना कोणत्याही परिस्थितीत सहन केले जाणार नाही. विद्यार्थ्यांच्या न्यायासाठी आणि पारदर्शक परीक्षा व्यवस्थे कोचिंग क्लासेस असोसिएशन महाराष्ट्र पुढेही ठामपणे लढा देत राहील. प्रा. गोपीचंद चाटे सर यांनी केवळ महाराष्ट्राला टार्गेट न करता संपूर्ण देश पातळीवर याची निष्पक्षपणे चौकशी व्हावी अशी केली. पत्रकार परिषदेला असोसिएशनचे राज्य पदाधिकारी प्रा. संदीप मस्के, प्रा. आप्पासाहेब मस्के पा., प्रा. अजाबराव मनवर, इप्पर, प्रा. व्ही. जे. सोसे, प्रा. संजय तांगडे, प्रा. अरुण पठाडे महानगर पदाधिकारी व कोचिंग क्लासेस संचालक मोठ्या प्रतिनिधी उपस्थित होते.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# मुख्य नाल्यांवरील बांधकामांना वाढीव कर; नाल्यात थेट ड्रेनेज सोडणाऱ्यांविरोधात विशेष मोहीम, आयुक्त अमोल येडगे यांचे निर्देश

छत्रपती संभाजीनगर दि.२३ (प्रतिनिधी)- शहरातील मुख्य नाल्यांवर परवानगी घेऊन उभारण्यात आलेल्या इमारतींमुळे नालेसफाईच्या कामात मोठे अडथळे निर्माण होत असून यामुळे शहरातील पावसाळी व्यवस्थापनावर गंभीर परिणाम होत असल्याची दखल घेत, अशा इमारतींना वाढीव कर आकारण्याचे निर्देश छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे आयुक्त श्री. अमोल येडगे यांनी आज संबंधित अधिकाऱ्यांना दिले. तसेच शहरातील नाल्यांमध्ये थेट ड्रेनेज सोडणाऱ्या नागरिकांविरोधात विशेष मोहीम राबवून कठोर कारवाई करण्याचे आदेशही त्यांनी यावेळी दिले.

आज दिनांक २२ मे रोजी आयुक्त श्री. अमोल येडगे यांनी शहरातील प्रमुख नाल्यांची प्रत्यक्ष पाहणी करून नालेसफाई कामाचा आढावा घेतला. कबाडीपुरा येथून या पाहणीची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर बारूदगर नाला, संभाजीपेठ तसेच रोपळेकर चौक परिसरातील मुख्य नाल्यांची पाहणी करून तेथील साफसफाई, अतिक्रमण आणि पाणी निचरा व्यवस्थेची माहिती घेतली.

पाहणीदरम्यान अनेक ठिकाणी मुख्य नाल्यांवर मोठ्या प्रमाणात बांधकामे उभारण्यात आल्याचे आयुक्तांच्या निदर्शनास आले. याबाबत अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली असता, संबंधित इमारतींना परवानगी देण्यात आल्याचे स्पष्ट झाले. मात्र अशा बांधकामांमुळे नाल्यांच्या स्वच्छतेच्या कामात मोठ्या अडचणी निर्माण होत असल्याचे आयुक्तांनी नमूद केले. नाल्यांवर बांधलेल्या इमारतींच्या खालच्या भागात कचरा साचून राहतो, त्यामुळे नालेसफाई पूर्ण क्षमतेने करता येत नाही. परिणामी पावसाळ्यात पाण्याचा निचरा अडथळला जाऊन पूरस्थिती निर्माण होण्याचा धोका वाढतो. या पार्श्वभूमीवर नाल्यांवर परवानगी घेऊन बांधकाम केलेल्या इमारतींना वाढीव कर आकारण्याबाबत कार्यवाही करण्याचे निर्देश त्यांनी संबंधित विभागाला दिले.

यावेळी शहरातील काही भागांत घरगुती व व्यावसायिक ड्रेनेज लाईन थेट नाल्यांमध्ये सोडण्यात आल्याचे प्रकारही समोर आले. या प्रकारामुळे नाल्यांमध्ये सांडपाणी मिसळून ते सतत दूषित राहतात, दुर्गंधी पसरते आणि नाल्यांची नैसर्गिक वहनक्षमता कमी होते. विशेषतः अतिवृष्टीच्या काळात नाल्यांमध्ये अतिरिक्त पाणी साचून ते ओसंडून वाहण्याचा धोका निर्माण होतो. याचा फटका नाल्याकाठच्या नागरिकांसह शहरातील इतर भागांनाही बसतो. ही गंभीर बाब लक्षात घेऊन संबंधित नागरिकांना नोटिसा बजावून त्यांचे ड्रेनेज एसटीपीशी (सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा) जोडण्याचे आदेश आयुक्तांनी दिले. यासाठी विशेष मोहीम राबवून कारवाई करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

आयुक्त येडगे यांनी सांगितले की, शहरातील नाले केवळ पावसाचे पाणी वाहून नेण्यासाठी आहेत. त्यामध्ये थेट सांडपाणी सोडल्यास नाल्यांची क्षमता कमी होते आणि पर्यावरणीय तसेच सार्वजनिक आरोग्याचे प्रश्न निर्माण होतात. त्यामुळे अशा प्रकारांना प्रतिबंध करण्यासाठी प्रशासन कठोर भूमिका घेणार आहे.

पाहणीदरम्यान कबाडीपुरा येथील महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रालाही आयुक्तांनी भेट देऊन तेथील सुविधांचा आढावा घेतला. तसेच रोपळेकर चौक परिसरात पाण्याची पाईपलाईन जमिनीवर आल्याचे त्यांच्या



निदर्शनास येताच त्यांनी संबंधित ठेकेदाराशी व्हिडिओ कॉलद्वारे संपर्क साधून प्रत्यक्ष परिस्थिती दाखवली आणि ती पाईपलाईन तातडीने जमिनीखाली टाकण्याचे निर्देश दिले.

शहरातील पावसाळी पूर्वतयारी, नालेसफाई, अतिक्रमण नियंत्रण आणि पाणी निचरा व्यवस्थेच्या कामांमध्ये कोणतीही हलगर्जी सहन केली जाणार नाही, असा इशाराही आयुक्तांनी यावेळी दिला. या पाहणीदरम्यान शहर अभियंता संजय कोंबडे, वॉर्ड अभियंता काझी जावेद, किरण तमनर, जनसंपर्क अधिकारी तौसीफ अहमद आदी उपस्थित होते.

# कर वसुलीत सुसूत्रता, पारदर्शकता आणि तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्यासाठी कर वसुली कर्मचाऱ्यांची प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न

छत्रपती संभाजीनगर दि.२३ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या कर वसुली प्रक्रियेत अधिक सुसूत्रता, पारदर्शकता आणि कार्यक्षमता आणण्याच्या उद्देशाने आज महानगरपालिकेच्या सर्व झोनमधील कर वसुली कर्मचाऱ्यांसाठी विशेष प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. 'श्रीमित्रा' ॲपच्या प्रभावी वापरातून जास्तीत जास्त थकबाकीदारांपर्यंत पोहोचून कर वसुली वाढविणे हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता.

या कार्यशाळेत छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे आयुक्त श्री अमोल येडगे यांनी उपस्थित सर्व कर वसुली कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की कर वसुली ही केवळ महसूल वाढीची प्रक्रिया नसून नागरिकांशी विश्वासपूर्ण संवाद साधत प्रशासनाची प्रतिमा उंचावण्याचे काम आहे. तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून कर वसुली अधिक पारदर्शक, गतिमान आणि परिणामकारक करण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

कार्यशाळेदरम्यान 'श्रीमित्रा' ॲपवर दररोजच्या कामाचे रिपोर्टिंग कसे करावे, मालमत्ता धारकांची माहिती अद्ययावत करण्याची पद्धत, कर वसुली करताना कोणत्या बाबींना प्राधान्य द्यावे, तसेच नागरिकांशी संवाद साधताना कोणती भूमिका ठेवावी याबाबत कर वसुली कर्मचाऱ्यांना सविस्तर प्रशिक्षण देण्यात आले. कर वसुली प्रक्रियेत केवळ आर्थिक बाबींवर भर न देता नागरिकांशी सौहार्दपूर्ण, सकारात्मक आणि परिणामकारक संवाद साधण्याच्या सॉफ्ट स्किल्स विकसित करण्यावरही विशेष भर देण्यात आला.

तसेच, सर्व झोन अधिकाऱ्यांना कर वसुली कर्मचाऱ्यांचे मॉनिटरिंग अधिक प्रभावीपणे कसे करावे, त्यांच्या दैनंदिन रिपोर्टिंगची पडताळणी कशी करावी आणि जास्तीत जास्त कर वसुलीसाठी नियोजनबद्ध पद्धतीने प्रयत्न कसे करावेत याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले.

महानगरपालिकेकडून सध्या 'श्रीमित्रा' ॲपच्या माध्यमातून कर वसुली कर्मचाऱ्यांचे रिअल-टाइम मॉनिटरिंग केले जात असून, त्याचे सकारात्मक परिणाम दिसून येत आहेत. याचाच प्रत्यय म्हणून मे महिन्यात कर वसुली कर्मचाऱ्यांनी तब्बल १२ हजार थकीत मालमत्तांना प्रत्यक्ष भेटी दिल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यामुळे थकबाकीदारांपर्यंत पोहोचण्याची प्रक्रिया अधिक प्रभावी होत असल्याचे प्रशासनाने नमूद केले.

कर वसुली कर्मचाऱ्यांमध्ये निरोगी स्पर्धा निर्माण करून अधिक चांगली कामगिरी करण्यासाठी सर्वाधिक कर वसुली करणाऱ्या तसेच जास्तीत जास्त थकीत मालमत्तांना भेटी देणाऱ्या कर्मचाऱ्यांना दर महिन्याला " " पुरस्कार देण्यात येणार असल्याची घोषणा यावेळी आयुक्त तसेच अतिरिक्त आयुक्त यांनी केली. या उपक्रमामुळे कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन मिळून कर वसुलीत आणखी वाढ होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

तांत्रिक क्षमता, जबाबदारीची जाणीव, प्रभावी संवादकौशल्य आणि नियमित मॉनिटरिंग यांच्या समन्वयातून कर वसुली प्रक्रिया अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने ही कार्यशाळा महत्त्वपूर्ण ठरली.

यावेळी सर्व कर वसुली कर्मचारी, कर अधीक्षक, झोन अधिकारी, उपायुक्त तसेच अतिरिक्त आयुक्त उपस्थित होते.

# महावितरणचे संचालक राजेंद्र पवार यांचा 'ग्लोबल एचआर लीडर ऑफ द इयर'ने सन्मान




छत्रपती संभाजीनगर दि.२३ (प्रतिनिधी)- जगभरातील सरकारी, औद्योगिक, शैक्षणिक व संशोधन संस्थांच्या समन्वयातून ऊर्जा व पर्यावरण क्षेत्रात काम करणाऱ्या ग्लोबल एनर्जी ॲण्ड एन्व्हायरमेंट फाउंडेशनच्या (जीईईएफ) वतीने महावितरणचे संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार यांचा विद्युत क्षेत्रात मानव संसाधनातील कामगिरीसाठी ग्लोबल एचआर लीडर ऑफ द इयर-२०२६ पुरस्काराने गौरव करण्यात आला.

'जीईईएफ'च्या वतीने शुक्रवारी (दि. २२) नवी दिल्ली येथे जागतिक ऊर्जा नेतृत्व परिषद-२०२६ चे आयोजन करण्यात आले. या परिषदेत स्वच्छ आणि हरित ऊर्जा तंत्रज्ञानाचा प्रसार करण्यासाठी विविध तज्ज्ञ सहभागी झाले होते व प्रामुख्याने विकसित भारत आणि ऊर्जा सुरक्षितता यावर विचारमंथन झाले.

महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांच्या मार्गदर्शनात संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार यांनी ८६ हजार कर्मचारी आणि सव्वा तीन कोटी वीजग्राहकांना केंद्रस्थानी ठेवून विद्युत सुरक्षिततेचे उपक्रम व त्यासाठी जागतिक विक्रमी लोकसहभाग, कर्मचारी कल्याण व प्रोत्साहनपर धोरण, कर्मचारी संघटना संवाद-उपक्रम, आधुनिक कौशल्य विकास प्रशिक्षण, मानव संसाधनामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, महिला कर्मचारी सन्मान व सक्षमीकरण, कर्मचाऱ्यांना हरित ऊर्जेसाठी प्रोत्साहन यासारखे कर्मचारी-हितैषी अनेक उपक्रम राबविले. व्यवस्थापनाच्या मंजुरीने धोरणात्मक निर्णय अंमलात आणले.

या कामगिरीचे मूल्यमापन करून 'जीईईएफ'च्या निवड समितीकडून जागतिक परिषदेत पुरस्कार जाहीर करण्यात आला. यात विद्युत क्षेत्रातील मनुष्यबळ विकासाच्या योगदानासाठी महावितरणचे संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार यांचा ग्लोबल एचआर लीडर ऑफ द इयर-२०२६ पुरस्काराने सन्मान करण्यात आला. भारतातील रशियन फेडरेशनचे उपायुक्त डॉ. एव्हगेनी ग्रिव्हा, आइसलँडचे राजदूत श्री. बेनेडिक्ट होस्कुल्डसन आणि नीती आयोगाचे माजी सदस्य डॉ. विजयकुमार सारस्वत यांच्या हस्ते श्री. पवार यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

# "निरामय छत्रपती संभाजीनगर" अभियानाला गती, आरोग्य सेवा तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी व्यापक नियोजन

## मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी कक्षाचे राज्यस्तरीय वैद्यकीय समन्वयक डॉ. सोनार यांची भेट

छत्रपती संभाजीनगर दि.२३ (प्रतिनिधी)- मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाच्या माध्यमातून "निरामय छत्रपती संभाजीनगर" अभियानाला गती देण्यासाठी मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाचे राज्यस्तरीय वैद्यकीय समन्वयक डॉ.स्वानंद सोनार यांनी शुक्रवारी (दि. २२) छत्रपती संभाजीनगर येथे प्रशासकीय अधिकारी, विविध कंपन्यांचे प्रतिनिधी, संघटना प्रमुखांसोबत भेटी दिल्या तसेच प्रत्यक्ष रुग्णांनाही भेटी देऊन पाहणी केली.

डॉ. सोनार यांनी विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, अप्पर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकूणे तसेच निवासी उप जिल्हाधिकारी जनार्दन विधाते यांच्यासमवेत "निरामय छत्रपती संभाजीनगर" या महत्त्वाकांक्षी प्रकल्पावर चर्चा केली. तसेच जिल्हा मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाने मागील चौदा महिन्यांत राबविलेल्या विविध आरोग्य उपक्रमांचाही आढावा घेण्यात आला. यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. बालाजी गोरे, समाजसेवा अधीक्षक शामसुंदर वाकळे आणि वैद्यकीय समन्वयक गजानन कांबळे उपस्थित होते.

डॉ. स्वानंद सोनार यांनी सांगितले की, जिल्ह्यातील सेवाभावी संस्था, रुग्णालये आणि औद्योगिक कंपन्यांनी एकत्रितपणे काम केल्यास आरोग्य सेवा अधिक प्रभावीपणे तळागाळापर्यंत पोहोचविता येऊ शकते.

जिल्ह्यात वाढत असलेले स्तनाचा कर्करोग, गर्भाशयाच्या तोंडाचा कर्करोग, सिकलसेल, ॲनिमिया आदी आजारांच्या पार्श्वभूमीवर झोपडपट्ट्या, आदिवासी पाडे, तांडे, असंघटित कामगार आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी विशेष आरोग्य प्रकल्प राबविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. कर्करोगाचे प्रारंभिक टप्प्यात निदान व्हावे यासाठी शेवटच्या घटकापर्यंत जाऊन स्क्रीनिंग मोहीम राबविण्याची आवश्यकता असल्याचे डॉ. सोनार यांनी सांगितले.

डॉ. स्वानंद सोनार यांनी छत्रपती संभाजीनगर येथील कर्नावट हॉस्पिटल तसेच श्री भगवान महावीर हॉस्पिटल या रुग्णालयांना अचानक भेटी देऊन उपचारासाठी दाखल रुग्णांची प्रत्यक्ष भेट घेत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.

विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांच्यासोबत झालेल्या बैठकीत सीएसआर निधी आणि मराठवाड्यातील उद्योजकांच्या



सहकार्याने आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यासंदर्भात प्राथमिक चर्चा करण्यात आली. तसेच अप्पर जिल्हाधिकारी संभाजी अडकुणे आणि निवासी उपजिल्हाधिकारी जनार्धन विधाते यांच्यासोबत जिल्ह्यातील सेवाभावी संस्था, उद्योजक आणि दात्यांच्या सहकार्याने "निरामय छत्रपती संभाजीनगर" अभियान अधिक प्रभावी करण्याबाबत चर्चा झाली.

शासकीय निधीचा अपहार करणारी, खोटी प्रकरणे सादर करणारी रुग्णालये आणि मध्यस्थांविरोधात जिल्हा कक्षाच्या सहाय्याने भरारी पथकाद्वारे आकस्मिक तपासणी व पडताळणी करून कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही डॉ. स्वानंद सोनार यांनी दिला.

# द्रुतगती मोजणी १४ दिवसांत, नियमित २८ दिवसांत पूर्ण करा, जमाबंदी आयुक्त शैलेश नवाल यांचे निर्देश

छत्रपती संभाजीनगर दि.२३ (प्रतिनिधी)- राज्यातील द्रुतगती मोजणी प्रकरणे १४ दिवसांत तर नियमित मोजणी प्रकरणे २८ दिवसांत पूर्ण करून अर्जदारांना नकाशाची "क" प्रत देण्यात यावी, असे निर्देश जमाबंदी आयुक्त तथा संचालक भूमी अभिलेख शैलेश नवाल यांनी काल (दि. २२) येथे दिले.

जमाबंदी आयुक्त तथा संचालक भूमी अभिलेख शैलेश नवाल यांनी २१ व २२ मे रोजी छत्रपती संभाजीनगर येथे भेटी देऊन भूमी अभिलेख विभागाच्या विविध कामांचा आढावा घेतला.

गुरुवारी (दि.२१)रोजी त्यांनी उपसंचालक भूमी अभिलेख, छत्रपती संभाजीनगर प्रदेश कार्यालयास भेट देऊन विभागातील सर्व जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख, उप अधीक्षक भूमी अभिलेख व नगर भूमापन अधिकारी यांची ऑनलाईन बैठक घेतली. यावेळी प्रलंबित प्रकरणे विहित मुदतीत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. विशेषतः ज्या तालुक्यांमध्ये द्रुतगती मोजणी १४ दिवसांत आणि नियमित मोजणी २८ दिवसांत पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत, त्या तालुक्यांचा प्रकरणनिहाय आढावा घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना त्यांनी केल्या.

तसेच प्रशिक्षण प्रबोधिनीला भेट देऊन आवश्यक सुधारणा, निधी प्रस्ताव सादर करणे तसेच प्रशिक्षणार्थी कर्मचाऱ्यांची क्षमता बांधणी याबाबत मार्गदर्शन केले.

नक्शा पथदर्शी प्रकल्पांतर्गत कन्नड नगर परिषद हद्दीतील गावठाण क्षेत्राचा अंतिम नकाशा व सनद श्री. नवाल यांना सादर करण्यात आली.

उप अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयास भेट देऊन श्री. नवाल यांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांशी संवाद साधला, त्यांच्या समस्या जाणून घेतल्या आणि कार्यालय स्वच्छ व सुस्थितीत ठेवण्याच्या सूचना दिल्या.

राज्यातील प्रत्येक तालुक्यात पुढे "e-Mahabhumi" केंद्र स्थापन करून नागरिकांना ऑनलाईन सेवा उपलब्ध करून देण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

मौजे मुकुंदवाडी, ता. छत्रपती संभाजीनगर येथील रेल्वे दुहेरीकरण भूसंपादन मोजणी कामाची पाहणी करून आवश्यक मार्गदर्शक सूचना दिल्या.

भूमी अभिलेख प्रशिक्षण प्रबोधिनीच्या सभागृहातून राज्यातील सर्व उपसंचालक व जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख यांची ऑनलाईन बैठक घेण्यात आली. या बैठकीत १ जून २०२६ पासून राज्यातील निवडलेल्या सर्व कार्यालयांत द्रुतगती मोजणी १४ दिवसांत आणि नियमित मोजणी २८ दिवसांत पूर्ण करून नकाशा "क" प्रत देण्याची कार्यवाही सुरू करण्याचे आदेश देण्यात आले. प्रत्येक नागरिकाला स्वतंत्र प्रॉपर्टी कार्ड व नकाशा उपलब्ध व्हावा यासाठी विविध कार्यालयांत सुरू असलेली मिळकतींची एकत्रित गठ्ठा कार्ड पद्धत रद्द करून प्रत्येक मिळकतीचे स्वतंत्र प्रॉपर्टी कार्ड व नकाशा तयार करण्यासाठी मानक कार्यप्रणाली तयार करून तत्काळ अंमलबजावणी सुरू करण्याचे निर्देश श्री. नवाल यांनी दिले.

# सीजेपीच्या अभिजीत दीपकेच्या घराबाहेर पोलिस बंदोबस्त, आई-वडिलांशी संपर्क नाही, पोलिसांनी सुरक्षित स्थळी हलवल्याची शक्यता

छत्रपती संभाजीनगर दि.२३ (प्रतिनिधी)- सोशल मीडियावरील कॉकरोच जनता पार्टीच्या माध्यमातून देशातील व्यवस्था व बेरोजगारीवर तिखट हल्ला करणाऱ्या अभिजीत दीपके यांना जीवे मारण्याची धमकी मिळाली आहे. दीपके यांनी स्वतः या धमकीचा स्क्रीनशॉट शेअर केल्यामुळे देशात खळबळ माजली आहे. परिणामी, खबरदारी म्हणून पोलिसांनी छत्रपती संभाजीनगरच्या वाळूज येथील त्यांच्या निवासस्थानी बंदोबस्त वाढवला आहे.

सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी काही दिवसांपूर्वी देशातील बेरोजगार तरुणांना कॉकरोच अर्थात झुरळांची उपमा दिली होती. त्याचे सोशल मीडियात तीव्र पडसाद उमटलेत. अभिजीत दीपके नामक छत्रपती संभाजीनगर येथील एका मराठी तरुणाने सरन्यायाधीशांच्या विधानाविरोधात चक्क कॉकरोच जनता पार्टीची स्थापना केली आहे. या पार्टीला सोशल मीडियात मोठा प्रतिसाद मिळाला आहे. या पार्टीच्या फॉलोअर्सची सख्याही मोठ्या प्रमाणात वाढली आहे.

परिणामी, प्रस्थापित पक्षाच्या एका कार्यकर्त्याने अभिजीत दीपके यांना जीवे मारण्याची धमकी दिली आहे.

या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीनगर पोलिसांनी खबरदारी म्हणून अभिजीतच्या वाळूज येथील घराबाहेर पोलिस बंदोबस्त तैनात केला आहे. याठिकाणी पोलिसांची एक व्हॅनही उभी आहे. विशेष म्हणजे अभिजीतच्या आई-वडिलांशी सध्या कोणताही संपर्क होत नाही. त्यामुळे त्यांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अभिजीत दीपके व त्याच्या कॉकरोच जनता पार्टीविषयी लोकांमध्ये फार उत्सुकता आहे. त्याचे वेगळे पडसाद उमटू नये म्हणून खबरदारीस्तव त्याच्या घराबाहेर पोलिस संरक्षण तैनात करण्यात आले आहे. ही सुरक्षा पुढील काही दिवस अशीच राहील, अशी माहिती संभाजीनगरचे पोलिस उपायुक्त पंकज अतुलकर यांनी दिली.

# घटना दुरुस्ती केल्या शिवाय आणि मर्यादा वाढविल्या शिवाय आरक्षण कसे देणार? म्हणुन दिल्लीत आंदोलन करणार -मराठा क्रांती मोर्चा

पुणे दि.२३ (प्रतिनिधी)- मराठा आरक्षणाचा विषय असेल किंवा मराठा समाजाच्या उन्नतिचे प्रश्न असतील या प्रश्नांची उकल कायदेशीर व घटनात्मक पद्धतीने होऊन उन्नतीचा शास्वत मार्ग शासनाने काढावा म्हणुन आरक्षणाची मर्यादा वाढविण्या शिवाय पर्याय नाही म्हणुन आता दिल्लीत केंद्र शासनाकडे मागणी करण्यासाठी दिल्लीत आंदोलन करणार असल्याची माहिती पुणे येथील भरगच्च पत्रकार परिषदेत मराठा क्रांती मोर्चाचे राज्य समन्वयक नाना साहेब जावळे आणि रमेश केरे पाटील यांनी पुणे येथे दिली.

पुढे बोलतांना ते म्हणाले की,आम्ही आमच्या तज्ञ व जेष्ठ अभ्यासक ज्यांनी वयाची ३८ वर्षपेक्षा जास्त कार्यकाळ विविध आयोगा समक्ष सुनावणी मध्ये समाजासाठी घालवला ते आयोग म्हणजे शामसुंदर आयोग,खत्री आयोग, सराफ आयोग, बापट आयोग, भाटीया आयोग एवढेच काय तर केंद्र शासनाच्या जॉईंट

पार्लीयामेंट कमिटी तसेच न्याय. रोहिणी आयोग तसेच नजीकचे न्यायमूर्ती एम जी गायकवाड आयोग, न्यायमूर्ती शुक्रे आयोग यांचे समक्ष एक एक बाब स्पष्ट करत मेहनती व परीश्रमाची कठीण अशी अभ्यासु वाटचाल करतांना घरावर तुळशी पत्र ठेवल्याची अभिमानाची बाब उभा महाराष्ट्र जाणतो ते सर्वोच्च न्यायालय तसेच उच्च न्यायालया तील मराठा समाजाच्या वतीने असलेले मुख्य हस्तक्षेप याचिका कर्ते आणि आरक्षणाचे जेष्ठ अभ्यासक डॉ. राजेंद्र दाते पाटील यांचे वतीने कायदेशीर व घटनामक मार्गदर्शन व्हावे म्हणुन एक पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन(पी पी टी )तयार करून ठेवले असल्याची माहिती भव्य पत्रकार परिषदेत आम्ही देत असल्याची बाब मराठा क्रांती मोर्चाचे राज्य समन्वयक नाना साहेब जावळे आणि रमेश केरे पाटील यांनी स्पष्ट करून अनेक समाजो पयोगी मागण्या त्यांनी केल्या असुन त्यात

१)मराठा आरक्षणविरोधी याचीका आयोगाच्या निरीक्षणाच्या नोंदी न तपासताच आहेत असे प्रतिपादन आरक्षणाचे आमचे जेष्ठ अभ्यासक यांनी वेळो वेळी केले आहे. सदरच्या याचीकेत प्रमुख आक्षेप हा ५०% मर्यादा हा विषय प्रामुख्याने पुढे आला असुन कायदेशीर प्रश्न हा आहे की, न्यायमुर्ती सुनील सुक्रे आयोगाचा अहवाल व शिफारशी न तपासताच बहुसंख्य अंदाजावर आधारीत याचीका मुबंई उच्च न्यायालयात असल्याचे स्पष्ट होत आहे. ज्या इंद्रा सहानी निकालाचा सातत्याने संदर्भ दिला जातो त्याचा तपशील तपासता यात बरेच काही दडलेले असुन यथा योग्य बचाव केला तर या निकालातील अनुक्रमांक ८१० असे म्हणतो कि," सर्वोच्च न्यायालयाने इंद्रा साहनी निकालाच्या पॅरेग्राफ क्रमांक ८१० मध्ये असे म्हटले आहे की ५०% नियमांचे उल्लंघन करण्यासाठी राज्याने अत्यंत सावधगिरी बाळगली पाहीजे. न्यायालयाचा रेफरल साठी:५० % हा नियम असला तरी, या देशाच्या आणि लोकांच्या महान विविधते मध्ये अंतर्भूत असलेल्या काही विलक्षण परिस्थितींचा विचार करणे आवश्यक आहे. असे होऊ शकते की, दूरच्या आणि दुर्गम भागात राहणारी लोकसंख्या कदाचित मुख्य प्रवाहातून बाहेर असल्याच्या कारणास्तव राष्ट्रीय जीवन आणि त्यांच्यासाठी विलक्षण आणि वैशिष्ट्यपूर्ण परिस्थिती लक्षात घेता, वेगळ्या पद्धतीने उपाय करणे आवश्यक आहे, या कठोर नियमात काही शिथिलता अनिवार्य होऊ शकते. असे करताना अत्यंत सावधगिरी बाळगली पाहिजे आणि एक विशेष बाब तयार केली पाहीजे."अशा बाबी स्पष्ट पणे नमुद असुन त्याचा तपशील जर का तपासला तर यात बरेच काही दडलेले असुन यथा योग्य बचाव केला तर या निकालातील अनेक अनु क्रमांकांचा फायदा घेणे शक्य असल्याचे प्रतिपादन आरक्षणाचे जेष्ठ अभ्यासकांनी वेळो वेळी करून सुद्धा शासन अजिबात लक्ष देत नाही. २) सारथी संस्था अंत्यन्त दुरदृष्टीने भविष्यात सुद्धा कार्यरत रहावी म्हणुन आमच्याच तज्ञानी व जेष्ठ अभ्यासकांनी तयार केलेले अभ्यासु असे ट्रेनींग प्रोग्राम डिझाईन करून शासनास आमच्या मराठा समाजाच्या जेष्ठ अभ्यासकांनी आणि समन्वयकांनी दिलेले आहे. त्यावरच आज तगायात अंमल बजावणी झाली नाही.३)स्वआण्णा साहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ आणि सारथी यांना एकमेकांशी " टाय अप " करून आणि त्यातील कर्ज वितरण पद्धती मध्ये अमूलाग्र दुरुस्ती करणे, मराठा समाजाच्या सर्वच स्तरातील विद्यार्थी,युवा वर्ग, शेतकरी,कष्टकरी, महिला वर्गाची आर्थिक उन्नती,शेतीसाठी उपयुक्त उत्पन्न वाढीच्या योजना आमच्या या जेष्ठ अभ्यासकांनी आणि समन्वयकांनी तयार करून ठेवल्या आहेत ते प्रत्यक्ष मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उप मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे,उप मुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांनी सदरचे पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन(पीपीटी) पाहण्यासाठी तात्काळ बैठकीचे नियोजन करून त्यात सुचवलेला शास्वात मार्ग मराठा समाजाच्या उन्नती व प्रगती साठी स्वीकारा वा अशी मागणी या पत्रकार परिषदेच्या माध्यमातून शासना कडे आम्ही करत असल्याचे प्रतिपादन अ भा छावा संघटनेचे अध्यक्ष आणि मराठा क्रांती मोर्चाचे राज्य समन्वयक नाना साहेब जावळे आणि आंदोलक राज्य समन्वयक रमेश केरे पाटील यांनी केली असुन ४) मराठा आरक्षण विषयावर ज्यांचे कडे पुरावा आहे त्यांनी कुणबी जात प्रमाणपत्र मिळवणे आणि त्याची कायदेशीर पडताळणी होणे या साठी सोप्या पद्धती अवलंब करणे आदी बाबींची आमची मागणी असुन इतर कुठल्याही मार्गाने हे प्रश्न हाताळणे अयोग्य ठरणारे आहेत.यात मुख्य बाब माधुरी पाटील विरुद्ध महाराष्ट्र शासन या प्रकारणात घटनापीठाणे घालून दिलेले निर्देश बदलणे, त्यात सुधारणा करणे, ते दुर्लक्ष करणे व नव्याने काही शासनादेश किंवा शासनाचे परिपत्रक काढणे म्हणजे या निर्देशा चे भंग ठरेल म्हणुन या वर काढण्यात आलेला कायदेशीर व घटनात्मक मार्गच मराठा समाजाला न्याय मिळवून देऊ शकतो आणि नेमकी हीच बाब राज्य शासन का दडवून ठेवत आहे हाच मोठा प्रश्न महाराष्ट्रा तील जनसामान्य उपस्थित करीत असल्यामुळे राज्य शासनाने या बाबींचा गांभीर्याने विचार करून त्वरित बैठकीचे नियोजन करावे अशी मागणी आजच्या या पत्रकार परिषदेच्या माध्यमातून अ भा छावा संघटनेचे अध्यक्ष आणि मराठा क्रांती मोर्चाचे राज्य समन्वयक नानासाहेब जावळे आणि आंदोलक राज्य समन्वयक रमेश केरे पाटील यांनी केले आहे.या पत्रकार परिषदेस अनेक मान्यवर समाज बांधव उपस्थित होते.